RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२४३ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.२९ नोव्हेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## गरीब कल्याण अन्न योजनेला पुढील पाच वर्षांसाठी मुदतवाढ - मोदी मंत्रिमंडळाचा निर्णय

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या मंत्रिमंडळाची आज बैठक झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यावेळी गरीब कल्याण अन्न योजनेला पुढील पाच वर्षांसाठी मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. ही योजना १ जानेवारी २०२४ पासून लागू होणार आहे. याशिवाय, ड्रोन सखी योजनेलाही मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत महिलांना ड्रोन उडवण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

मंत्रिमंडळाच्या निर्णयाची माहिती देताना माहिती प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर म्हणाले की, कोविड महामारीच्या

### ड्रोन सखी योजनेलाही मंजुरी



काळात पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना सुरू करण्यात आली होती. ही योजना १ जानेवारी २०२४ नंतर पुढील पाच वर्षांसाठी वाढवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. तसेच, ड्रोन सखी योजनेलाही मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत महिलांना ड्रोन उडवण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. ड्रोनद्वारे शेतात कीटकनाशकांची फवारणी केली जाणार आहे.

ड्रोन उडवणाऱ्या महिलेला दरमहा १५ हजार रुपये मानधन आणि सहाय्यकाला १० हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. ही योजना २०२६ पर्यंत सुरू राहणार असून यासाठी एकूण १२६१ कोटी रुपये खर्च होणार आहे. याशिवाय, मंत्रिमंडळाच्या बैठकीत १६ व्या वित्त आयोगासाठी टर्म ऑफ रेफरन्सला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. सध्याच्या आयोगाचा कार्यकाळ मार्च २०२६ पर्यंत आहे. याचबरोबर, बलात्कार आणि पॉक्सो कायद्यांतर्गत जलदगती विशेष न्यायालय २०२६ पर्यंत सुरू ठेवण्यास मंत्रिमंडळाने सहमती दर्शवली आहे.

## आम्ही सीएए आणणारच, आम्हाला कोणीही रोखू शकत नाही, अमित शाहांचे मोठे विधान

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

नागरिकत्व सुधारणा विधेयक सीएए पुन्हा चर्चेत आले आहे. बुधवारी पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथे एका रॅलीला संबोधित करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सीएए संदर्भात मोठे विधान केले. आम्ही बंगालमध्ये सीएए आणणारच. हा देशाचा कायदा असून आम्हाला कोणीही रोखू शकत नाही, असे अमित शाह यांनी म्हटले आहे. तसेच, पश्चिम बंगालमधीलममता बॅनर्जी यांच्या सरकारवर अमित शाह यांनी जोरदार हल्लाबोल केला.

बंगालच्या जनतेने ठरवले आहे की, पुढचे सरकार भाजपच बनवणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी बंगालच्या जनतेला लाखो



रुपये पाठवतात, पण तृणमूल काँग्रेस हे पैसे गरिबांपर्यंत पोहोचू देत नाही. तसेच, बंगालमध्ये निवडणुकीदरम्यान सर्वाधिक हिंसाचार होताना दिसतो. बंगालमध्ये घुसखोरी थांबवली जात नाही. बंगालमध्ये बॉम्बस्फोटाचे आवाज येतायेत, असे अमित शाह म्हणाले.

बंगालमध्ये कम्युनिस्टांनी २७ वर्षे राज्य केले. तिसऱ्या टर्ममध्ये ममता बॅनर्जी यांचे सरकार स्थापन झाले. दोघांनी मिळून बंगालला संपवण्याचे काम केले. संपूर्ण देशात निवडणुकीतील हिंसाचार बंगालमध्ये सर्वाधिक आहे. ममता बॅनर्जी बंगालमधील घुसखोरी रोखू शकलेल्या नाहीत. राज्यात घुसखोरांना मतदार कार्ड आणि आधार कार्ड खुलेआम वाटले जात असून यावर ममता बॅनर्जी गप्प बसल्या आहेत, असा आरोप अमित शाह यांनी केला.

सोनार बांगला आणि माँ माटी मानुषचा नारा देत कम्युनिस्टांना हटवून ममता दीदी सत्तेवर आल्या. पण बंगालमध्ये बदल झाला नाही. आजही बंगालमध्ये घुसखोरी, तुष्टीकरण, राजकीय हिंसाचार आणि भ्रष्टाचार होत आहे. ज्या बंगालमध्ये एकेकाळी रवींद्र संगीत ऐकू येत होते, ते आज बॉम्बस्फोटांनी गुंजत आहे. संपूर्ण देशातून गरिबी हटवली जात आहे, पण बंगालमध्ये तसे होताना दिसत नाही. बंगालमध्ये भ्रष्टाचार शिगेला पोहोचला आहे, असे म्हणत अमित शाह यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली.

## आमदार अपात्रता निकाल ३१ डिसेंबरपर्यंत कठीण! राहुल नार्वेकर सुप्रीम कोर्टाकडे मुदतवाढ मागणार?

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

गेल्या काही दिवसांपासून आमदार अपात्रता प्रकरणाची नियमित सुनावणी विधिमंडळात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुरू आहे. या सुनावणीत अनेक दावे-प्रतिदावे, आरोप केले जात आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ३१ डिसेंबरपर्यंत आमदार अपात्रतेप्रकरणी निर्णय घेण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्षांना दिले आहेत. मात्र, दिलेल्या मुदतीत निकाल देणे कठीण असून, यासाठी वेळ वाढवून द्यावा, अशी विनंती सर्वोच्च न्यायालयाकडे केली जाण्याची शक्यता असल्याची चर्चा सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर ते २०



डिसेंबर या कालावधीत होणार आहे. एकीकडे आमदार अपात्रता प्रकरणाची नियमित सुनावणी होत असताना दुसरीकडे विधिमंडळाचे कामकाज असणार आहे. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासाठी मुदतीत सुनावणी घेऊन निर्णय घेणे कठीण असल्याचे बोलले जात आहे. हे सर्व करताना राहुल नार्वेकर यांची तारेवरची कसरत होणार असून, ओव्हरटाइम करावा लागेल, असे म्हटले जात आहे. विधिमंडळाचे दैनंदिन कामकाज आटोपल्यानंतर सायंकाळी आमदार अपात्रतेप्रकरणी सुनावणी घेतली जाऊ शकते, असा कयास बांधला जात आहे.

**निकाल येण्यासाठी २० ते २५ दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता**

आताच्या घडीला सुनील प्रभू यांची साक्ष नोंदवली जात आहे. यानंतर सचिव विजय जोशी यांची साक्ष नोंदवली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. डिसेंबर महिन्यापासून शिंदे गटाच्या नेत्यांची उलट साक्ष घेतली जाणार आहे. यामध्ये भरत गोगावले, दीपक केसरकर, उदय सामंत, योगेश कदम, दिलीप लांडे आणि राहुल शेवाळे यांचा समावेश असल्याचे समजते. सध्या शिंदे गटाच्या वकिलांना उलट साक्ष घेण्यास मुदत आहे. १ ते ११ डिसेंबरपर्यंत ठाकरे गटाचे वकील उलट साक्ष घेणार आहेत. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांना या प्रकरणात सुनावणी आटोपताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. साक्ष संपल्यावर निकाल देण्यास २० ते २५ दिवसाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. एकंदर परिस्थिती पाहता विधानसभा अध्यक्षांकडून सर्वोच्च न्यायालयाकडे वेळ वाढवून मागण्याची विनंती केली जाऊ शकते, अशी चर्चा असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, आमदार अपात्रता प्रकरणात दिरंगाई होत असल्याचा आरोप ठाकरे गटाचा आहे. ठाकरे गटाचे आमदार आणि प्रतोद सुनील प्रभू यांची साक्ष नोंदवली जात आहे. यामध्ये शिंदे गटाच्या वकिलांकडून अनेक प्रकारचे प्रश्न प्रभू यांना विचारले जात आहे. तर २१ जून २०२२ च्या ठरावाबाबत केलेला दावा सुनील प्रभू यांनी फेटाळला आहे.

## राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाची तारीख अखेर ठरली, ७ डिसेंबरपासून सुरु होणार

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून सुरू होणार की ११ डिसेंबरपासून याबाबतचा गोंधळ होता. मात्र, अखेर आज हिवाळी अधिवेशनाची तारीख निश्चित झाली आहे. मुंबईत झालेल्या विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत तारखेबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशनास येत्या ७ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणार आहे.

राज्याच्या हिवाळी अधिवेशनाची तारीख जाहीर करण्याची मागणी विरोधकांकडून वारंवार होत होती. त्यानुसार आता राज्याच्या हिवाळी अधिवेशनाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला ७ डिसेंबरपासून सुरुवात होणार आहे. २० डिसेंबरपर्यंत हे अधिवेशन चालणार आहे. तसेच, १९ डिसेंबर रोजी पुन्हा कामकाज सल्लागार समितीची अधिवेशनात बैठक होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, विधिमंडळाच्या मुंबईत झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी नागपूरचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून सुरू होईल, अशी घोषणा झाली होती. मात्र, गेल्या आठवड्यात अशी चर्चा सुरू झाली, की अधिवेशन ११ डिसेंबरपासून सुरू होईल. ११ डिसेंबरपासून अधिवेशन घेतले तर पहिला दिवस शोकप्रस्तावात जाईल. दुसऱ्या दिवशी आरक्षण आदी विषयांवर गोंधळ होण्याची शक्यता आहे. म्हणजे प्रत्यक्ष अधिवेशन १३ डिसेंबरपासून सुरू होईल आणि २० डिसेंबरला अधिवेशन संपविले तर केवळ आठ दिवसांचे अधिवेशन होईल. त्यामुळे याबाबत संभ्रम निर्माण झाला होता.



### सरकार अधिवेशनाबाबत गंभीर नाही – विजय वडेट्टीवार

किमान तीन आठवडे हे अधिवेशन चालावे, अशी आमची अपेक्षा होती. मात्र सरकार राज्यातील प्रश्नांबाबत गंभीर दिसत नाही, अशी टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ३ आठवड्याच्या अधिवेशनाची मागणी होती. मात्र, सरकारने ३ आठवड्याऐवजी २ आठवड्याचे अधिवेशन ठेवले. अधिवेशनाबाबत सरकार गंभीर नाही, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

### अधिवेशनात जोरदार गदारोळ होण्याची शक्यता

मराठा आरक्षणावरुन सुरू असलेला संघर्ष, पुण्यातील ड्रग्ज माफिया ललित पाटील प्रकरण, कंत्राटी भरती, राज्यातील दुष्काळजन्य स्थिती, पाण्याचा प्रश्न, कायदा-सुव्यवस्था, अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान या मुद्द्यांवरून अधिवेशनात जोरदार गदारोळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अधिवेशनाची वेळ वाढविण्याची मागणी विरोधकांकडून करण्यात आली आहे.

## ‘शेतकऱ्यांना मदत मिळाल्याशिवाय अधिवेशन चालू देणार नाही’; विनायक राऊतांचा इशारा



**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणार आहे. मुंबईत झालेल्या विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत तारखेबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात आला आहे.

मराठा आरक्षणावरुन सुरू असलेला संघर्ष, पुण्यातील ड्रग्ज माफिया ललित पाटील प्रकरण, कंत्राटी भरती, राज्यातील दुष्काळजन्य स्थिती, पाण्याचा प्रश्न, कायदा-सुव्यवस्था, अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान या मुद्द्यांवरून अधिवेशनात जोरदार गदारोळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अधिवेशनाची वेळ वाढविण्याची मागणी विरोधकांकडून करण्यात आली आहे.

हिवाळी अधिवेशनाची तारीख निश्चित झाल्यानंतर ठाकरे गटाचे खासदार विनायक राऊत यांनी राज्य सरकारला इशारा दिला आहे. अवकाळी पाऊस आणि गारपिटीने हाता तोंडाशी आलेलं पीक गेलं आहे. पण, तेलंगणामध्ये जाऊन लोचत गिरी सुरू आहे. दुसरीकडे राज्यातील शेतकरी टाहो फोडतो आहे. सरकारने आधार द्यायला पाहिजे, पण तसे होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळाल्याशिवाय आमचे आमदार अधिवेशन चालू देणार नाही, असा इशारा विनायक राऊतांनी दिला आहे.

## रामलल्लाच्या महाआरतीला जोधपूरहून ११ रथांतून येणार अयोध्येला ६०० किलो तूप, १०८ कलश

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येत राम मंदिराचे बांधकाम वेगाने सुरू आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा राम मंदिरात केली जाणार आहे. जसजसे दिवस पुढे जात आहेत, तसे यासंदर्भातील तयारीला वेग आला आहे. या सोहळ्यासाठी हजारो भाविक अयोध्येत येणार आहेत. राम मंदिर आणि रामलल्ला प्राणप्रतिष्ठा यांमध्ये आपलाही काही खारीचा वाटा असावा, असे अनेकांना वाटत आहे. या पार्श्वभूमीवर आता अभिषेक आणि महाआरतीसाठी जोधपूरहून ६०० किलो तूप पाठवले जाणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पारंपरिक पद्धतीने बैलगाडी सजवून याचे १०८ कलश अयोध्येकडे रवाना करण्यात आले आहेत. १०८ कलशांमध्ये हे ६०० किलो तूप पाठवण्यात आले आहे. यामध्ये वापरण्यात आलेल्या बैलगाड्यांना रथाचे स्वरुप देण्यात आले आहे. हे कलश रवाना करण्यापूर्वी पूजन, आरती करण्यात आली. जोधपूरमधील



श्री श्री महर्षी संदीपनी रामधर्म गोशालाचे संचालक महर्षी संदीपनी महाराज यांनी यासंदर्भातील माहिती दिली.

**११ रथांमधून ६०० किलो तूप अयोध्येला पाठवण्यात आले**

रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी शेकडो रामभक्त अयोध्येला रवाना झाले आहेत. ११ रथांमध्ये १०८ कलशांसह १०८ शिवलिंग ठेवण्यात आले आहेत. यासह गणपती बाप्पा, रामभक्त हनुमान यांच्या प्रतिमा ठेवण्यात आल्या आहेत. उत्तर भारतात वैकुंठ चतुर्दशी आणि त्रिपुरारी पौर्णिमा या कालावधीत देव दिवाळी साजरी केली जाते. या देव दिवाळीच्या दिवशी शुभ मुहूर्तावर हे ११ रथ अयोध्येकडे रवाना करण्यात आले.

दरम्यान, जानेवारी २०२४ मध्ये राम मंदिरात रामलल्ला विराजमान होणार आहेत. आमच्या येथे असलेल्या गोठ्यांमधून तयार केलेले तूप रामलल्लाच्या आरती आणि हवनात वापरले जाईल. जोधपूरहून तूप पाठवले गेले ही भाग्याची गोष्ट आहे. गोशाळेतून ११ विशेष रथ रवाना करण्यात आले. ६ महिन्यांपासून रथ साकारण्याची तयारी सुरू होती. या प्रत्येक रथाची किंमत ३.५ लाख रुपये आहे. ९ वर्षांपूर्वी याचा संकल्प केला गेला होता. अयोध्येत जेव्हाही राम मंदिर बांधले जाईल, तेव्हा या ठिकाणाहून शुद्ध देशी तूप पाठवले जाईल. राम मंदिरात त्याच तुपाने मंदिराची अखंड ज्योत प्रज्वलित होणार आहे, असे महर्षी संदीपनी महाराज यांनी सांगितले.

## संपादकीय ......

# अवकाळीने तोंडचा घास हिरावला

दिवाळीचा उत्साह संपत नाही तोच अवकाळी पावसाने महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, खान्देश, पुणे, सातारा, मराठवाडा, कोकणाला अक्षरश: झोडपून काढले. भारताच्या पूर्वेला आणि पश्चिमेला असलेल्या अनुक्रमे बंगालचा उपसागर, अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला. परिणामी ऐन हिवाळ्यात संपूर्ण दक्षिण भारतासह महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये अवकाळी पाऊस झाला. नाशिक जिल्ह्यात ३२ हजार ८३२ हेक्टरवर कांदा, द्राक्ष, गहू आणि इतर पिकांचे नुकसान झाले. या पावसाचा फटका तब्बल ६८ हजार शेतकर्यांना बसला.

खान्देशात ऊस, केळी, पपई, मका आणि तूर या पिकांना फटका बसला. विदर्भात संत्री, कापूस पिकांचे नुकसान झाले. या पावसाने खरीपातील पिकांची मोठी हानी केली आहे. अनेकांच्या शेतांमध्ये कापूसबोंडे फुटली आहेत. ती भिजल्यामुळे शेतकर्यांचे मोठे नुकसान झाले. तसेच तुरीला आलेली फुलेदेखील या पावसामुळे गळून पडली. भाजीपाल्याचेही मोठे नुकसान झाले. फळबागांनादेखील मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे. तूर पिकवणार्या शेतकर्यांची स्थिती तुरीची विक्री होत नसल्याने बिकट झाली होती. अवकाळी पावसाने त्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. वसई, विरारसह पालघर जिल्ह्याच्या किनारपट्टीला अवकाळीचा मोठा फटका बसला आहे.जो-तो येतो आणि आश्वासनांचा अवकाळी पाऊस पाडून जातो. ती पूर्ण होतच नसल्याने शेतकरीवर्ग नैराश्याने ग्रासला आहे. हे दौरे केवळ राजकीय पोळी भाजण्यासाठीच असल्याचे शेतकर्यांना ठाऊक असल्याने त्यांचा त्रागा होत आहे. अशा परिस्थितीत खरी परीक्षा आहे ती शेतकर्याला कर्जमुक्त करण्याची भाषा करणार्या सरकारची. शेतकर्यांच्या हिताचे सरकार असल्याचा दावा सगळेच पक्ष करतात. तरीही मदतीबाबत मात्र हात आखडता घेतला जातो. खरे तर हे आखडलेले हात मोकळे व्हावे व प्रसंगानुरुप बंद केलेले डोळे उघडावे, यासाठीच सरकारने बांधावर जायचे असते. पण तेथे जाऊन, राजकीय भाष्य करू नये. अशा शाब्दिक कोट्यांमधून सरकारी संवेदनशीलतेचे ‘तीन तेरा’ होतात. जळीस्थळी राजकारण करण्याची गरज नाही.

तेव्हा आपदग्रस्तांचे अश्रू पुसा. केवळ समाधान व दिलाशाचे चार शब्द बोललात तरी शेतकरी सुखावतील. बाकी त्यांचे जगणे मागील पानावरून पुढे याप्रमाणे पाय ओढत चालले आहेच. उरतो प्रश्न पंचनाम्यांचा. २४ तासांच्या आत पंचनामे करा, असे आदेश मंत्र्यांनी संबंधित अधिकार्यांना दिले असले तरी गत अनुभव फारसा चांगला नाही. त्यातच २४ तासांचा काळ उलटून गेला आहे. त्यामुळे सरकारला आता ‘अ‍ॅक्शन मोड’मध्ये यावे लागेल. काडी वाकायला लागली त्याच वेळी तिला आधार दिला गेला तर ती टिकते. अन्यथा मोडून पडते. ती वेळ सरकारने येऊ देऊ नये म्हणजे झाले.

विमा कंपन्यांची एकूणच मक्तेदारी व मनमानीविषयी ठणाणा करूनही सरकारच्या कानीकपाळी काहीच पोहोचू शकलेले नाही. आजवरच्या असंख्य अवकाळीनंतर विमा कंपन्यांच्या मनमानीवर चर्चा झाली आहे. पण त्यावर उपाययोजना मात्र अद्याप झालेली नाही. अशा आकस्मिक संकटांना तोंड देण्यासाठी आपण किती सक्षम आहोत याचा विचार आता व्हायला हवा. शेतकर्यांची दु:खे अपार आहेत. ती अस्मानी आहेत, त्यापेक्षाही सुलतानी अधिक आहेत. सुलतानी समस्या कशा कमी होतील, यावर विशेष भर द्यायला हवा. भारतीय शेती निसर्गावर अवलंबून असल्याने त्यात धोके अधिक.

ते टाळणे अवघड असले तरी संशोधनाचा आधार घेऊन ते कमी कसे करता येतील, नुकसानीची भरपाई तातडीने करून हा समूह जिताजागता कसा ठेवता येईल, हा विचार आता तरी नियोजनाच्या केंद्रस्थानी हवा. विम्याच्या हप्त्याच्या केवळ दोन टक्के रक्कम शेतकर्यांकडून घेतली जात असतानाही अतिशय कमी शेतकर्यांनी विमा उतरविला. त्यातील काही जणांचीच पाहणी केली गेली. प्रत्येक ठिकाणी असे शॉर्टकट वापरले जात असल्यानेच मग शेतकर्याला पंधरा रुपयांचा धनादेश मिळतो किंवा काही हजार शेतकरी बनावट तरी निघतात. ही सारी जुमलेबाजी थांबत नाही, तोपर्यंत शेतकर्यांच्या हिताच्या कितीही गप्पा मारल्या तरीही ते हित कोसो दूरच राहणार!

# ४१ मजुरांना जीवदान

## १७ दिवसांच्या प्रयत्नांना यश

### सर्व मजुरांचे धैर्य अन् संयम प्रेरणादायी; पंतप्रधान मोदींकडून सर्वांना सलाम





**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक उत्तरकाशी :** उत्तराखंडमधील उत्तरकाशी बोगद्या अडकलेल्या सर्व ४१ मजुरांना बाहेर काढण्यात एनडीआरएफच्या टीमला यश आले आहे. एनडीआरएफच्या टीमने सर्व मजुरांना अवघ्या तासाभरात बाहेर काढलं आहे. तसेच बोगद्याच्या आतच मजुरांसाठी तात्पुरते रुग्णालय बांधण्यात आले आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करताना सर्व मजुरांचे कौतुक केले असून बचावकार्याशी संबंधित सर्वांना सलाम केला आहे. नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करताना म्हटले की, उत्तरकाशीतील आमच्या मजूर बांधवांच्या बचावकार्याचे यश सर्वांनाच भावूक करत आहे. बोगद्यात अडकलेल्या मजुरांना मी सांगू इच्छितो की, तुमचे धैर्य आणि संयम सर्वांना प्रेरणा देणारे आहे. मी तुम्हा सर्वांसाठी चांगल्या आरोग्यासाठी प्रार्थना करतो. प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर सर्व मजूर त्यांच्या कुटुंबियांना भेटणार आहेत, ही समाधानाची बाब आहे. या आव्हानात्मक काळात या सर्व कुटुंबियांना दाखवलेल्या संयमाचे आणि धैर्याचे कौतुक करता येणार नाही. या बचाव कार्याशी संबंधित सर्व लोकांच्या इच्छाशक्तीला मी सलाम करतो. त्यांच्या शौर्याने आणि जिद्दीने सर्व मजुर बांधवांना नवसंजीवनी मिळाली आहे. या बचावकार्यात सामील असलेल्या प्रत्येकाने माणुसकी आणि टीमवर्कचे एक अद्भुत उदाहरण ठेवले आहे, अशी भावना नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली.

### तासाभरात सर्व ४१ कामगारांची सुखरूप सुटका

दरम्यान, उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथे निर्माणाधीन सिल्कयारा-दांदलगाव बोगद्यामध्ये १७ दिवसांपासून अडकलेल्या ४१ मजुरांना सुखरूप बाहेर काढण्यात एडीआरएफच्या टीमला यश आले आहे. एनडीआरएफच्या टीमने सर्व मजुरांना अवघ्या तासाभरात बाहेर काढले. सर्व मजुरांसाठी बोगद्याच्या आतच तात्पुरते रुग्णालय बांधण्यात आले आहे. याठिकाणी सर्व मजुरांची वैद्यकीय तपासणी केली जाईल. त्यानंतर मजुरांना काही काळ याठिकाणी ठेवण्यात येईल. जेव्हा मजुरांसाठी तापमान सामान्य होईल, तेव्हा सर्व मजुरांना ३०-३५ किमी दूर असलेल्या चिन्यालिसौर येथे नेण्यात येईल. तसेच कोणत्याही कामगाराची तब्येत बिघडली तर त्याला तत्काळ एम्स ऋषिकेश रुग्णालयात भरती करण्यात येईल. यासाठी चिन्यालीसौर हवाई पट्टीवर चिनूक हेलिकॉप्टर तैनात करण्यात आले आहे.

# सराफा व्यावसायिकाच्या हल्लेखोरांना ताबडतोब अटक करा

## नरहरी माळवी सोनार संघ व सुवर्णकार संघाच्या वतीने पोलीस अधीक्षकांना निवेदन



**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती.** श्री नरहरी माळवी सोनार संघ, अमरावती जिल्हा सुवर्णकार संघाच्यावतीने तिवसा येथील सराफा व्यावसायिक संजय मांडळे यांची हत्या करून सोने, चांदी, पैसे लुटून नेणाऱ्या हल्लेखोरांना ताबडतोब अटक करा, अशी मागणी करण्यात आली. मंगळवारी या संदर्भात पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले.

तिवसा तालुक्यातील सोनार समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती, सराफा व्यावसायिक संजय मांडळे यांच्यावर २७ नोव्हेंबरला सायंकाळी ७ वाजता पाच ते दहा अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्या स्टेट बॅक कॉलनी तिवसा येथील घरात घुसून घरातील मौल्यवान वस्तु, सोने, चांदी, रुपये पैसै लुटून नेले. संजय मांडळे यांनी त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला असता चोरट्यांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करून लाखो रुपयांचा माल घेऊन चोरटे पसार झाले. यामध्ये संजय मांडळे जबर जखमी होवुन त्यांचा मृत्यु झाला. ज्यावेळी हा हल्ला झाला त्यावेळी त्यांचे कुटुंबियांमधील त्यांच् कोणीचं सदस्य घरी हजर नव्हते. वडिल गावी व पत्नी मुले दवाखाण्यात गेले होते. ही घटना अगदी दिवसाढवळ्या घडली. त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील सुवर्णकार, सराफा व्यावसायिक अत्यंत भयभीतझालेले असून अशा दरोडेखोरांवर ताबडतोब पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करून त्यांना अटक करावी. जेणेकरून यानंतर अशा प्रकारच्या घटना घडणार नाही. अशी मागणी सर्व सोनार बांधवांतर्फे नरहरी माळवी सोनार संघ,अमरावती जिल्हा सुवर्णकार संघ यांच्या वतीने करण्यात आली. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांना निवेदन देताना अमरावती नरहरी माळवी सोनार संघाचे अध्यक्ष राजेश अनासाने, उपाध्यक्ष विनोद गुहे, राजू तारेकर, सचिव राजेंद्र धरमठोक, कोषाध्यक्ष मिलिंद अनासाने सह नितीन खांडेकर, अमरावती जिल्हा सुवर्णकार संघाचे अध्यक्ष अजय तीनखेडे, विनायक चेडे, राजू बहाळे, चंद्रशेखर हाडे, प्रमोद तारेकर, निलेश मारोडकर, अशोकराव हिरुळकर, महेंद्र गुंबडे, राजू खडेकर, अरुण मांडले, सुधीर शेंदुरकर, कर, भारती गुहे, महेश आष्टीकर, संकेत तारेकर, विशाल चिंचमलापुरे, अमित विंचुरकर, सचिन पाटणे, सागर बुटे, प्रवीण सावरकर, सचिन मालोकार, हनुमंत कुंभार, प्रवीण तारेकर सह समाज बांधव उपस्थित होते.




# थंडीत शिंगाडा खाणं आरोग्यदायी

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक-** थंडीमध्ये आरोग्याची समस्या मोठ्या प्रमाणात वाढते. थंडीपासून बचाव करण्यासाठी अनेकजण आपल्या खाण्या-पिण्यामध्ये बदल करतात. हिवाळ्यात जशा आरोग्याच्या समस्या वाढतात तसेच, त्यावर उपयुक्त फळं, भाज्याही बाजारामध्ये उपलब्ध होतात. थंडीमध्ये बाजारामध्ये शिंगाड्यांची मुबलक प्रमाणात आवाक होते. शिंगाडा ही एक पाण्यातील भाजी असून, तिला ‘वॉटर चेस्टनट’ असेही म्हणतात. हे फळ पावसाळ्यात उगवतं आणि हिवाळ्याच्या सुरुवातीला बाजारात विक्रीसाठी येतं.

**शिंगाडा खाण्याचे फायदे**

या शिंगाड्यामध्ये कमी कॅलरीज आढळतात आणि त्यात प्रथिने,पोटॅशियम,तांबे, व्हिटॅमिन-बी ६ आणि रिबोफ्लेविनसारख्या पोषक तत्वांचा समावेश असतो. यामध्ये मोठ्या प्रमाणात फायबर देखील आढळते.

या फळामुळे वजन कमी होण्यास मदत होते.अनेकजण ते उकळून खातात. तसेच अनेकांना ते कच्चे खायलाही आवडते.



जर निद्रानाशाचा त्रास असेल तर, या समस्येवर मात करण्यासाठी तुम्हाला शिंगाडे फायदेशीर आहे.

शिंगाड्यामुळे घशाच्या अनेक समस्या दूर होतात.याशिवाय घसा खवखवणे यापासूनही सुटका मिळते.कारण शिंगाड्यामध्ये भरपूर प्रमाणात अँटी-ऑक्सिडंट गुणधर्म असतात.

पोटाच्या समस्या कमी करण्यासाठी शिंगाड्याचे सेवन करणे खूप फायदेशीर आहे. यामुळे गॅस, ॲसिडिटी, बद्धकोष्ठता आणि अपचन यांसारख्या समस्या दूर होतात.

मूळव्याधीचा त्रास असल्यास त्यावर शिंगाडा फायदेशीर आहे.

शिंगाडा खाल्ल्याने पायाच्या तळव्यांच्या भेगा भरुन येतात.

# ग्रामीण भागातील रस्ते विकासाच्या फायली केवळ मंजूर होऊनही पडल्या धूळखात




**दि२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर असलेल्या ३०-५४ व ५०-५४ या लेखाशीर्षाअंतर्गत मंजुरीनुसार बांधकाम विभागाने तयार केलेल्या रस्त्याच्या प्रशासकीय मान्यतेच्या फायली जिल्हा नियोजन समितीपर्यंत पोहोचल्या. मात्र, या फायलींवर समितीत कुणी चर्चा सुद्धा केली नाही त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते विकासाच्या फायली केवळ मंजूर होऊन पुन्हा पडून राहिल्या आहेत.

जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामाकरिता सुमारे ३६ कोटींचा निधी मंजूर केला आहे. या मंजूर निधीनुसार बांधकाम विभागाने ३०५४ ग्रामीण मार्ग व ५०५४ इतर जिल्हा मार्ग या लेखाशीर्षाखाली हा निधी मंजूर केला आहे. यामध्ये ग्रामीण मार्ग या लेखाशीर्षखाली ८१ कामांकरिता सुमारे १७ कोटी ९४ लाख, तर इतर जिल्हा मार्गाच्या ५५ कामांसाठी १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या मंजूर निधीनुसार जिल्हा परिषद बांधकाम विभागाने ग्रामीण भागातील विविध रस्त्यांच्या कामासाठी प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव तयार केले आहेत.

सदर प्रस्ताव तयार करून आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी ग्रामीण भागातील रस्त्याची कामे सुरू होऊन पूर्ण होतील. यादृष्टीने नियोजन केले. ही कामे मार्गी लावण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत या प्रस्ताव पाठविण्यात आले. मात्र, २४ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या सुमारे ३६ कोटींच्या प्रस्तावावर कुठल्याही प्रकारची चर्चा झाली नाही. त्यामुळे रस्ते विकासाच्या फायली चर्चा व मंजुरीविनाच तशाच पडून राहिल्याची माहिती आहे. परिणामी आता या कामांना केव्हा मान्यता मिळणार अन् कधी कामे सुरू होणार, हा खरा प्रश्न प्रशासकीय यंत्रणेसमोर उभा ठाकला आहे.

# २४ जिल्ह्यांतील शिवार होणार जलयुक्त

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई,** राज्यात जलयुक्त शिवारच्या दुसर्या टप्प्यास गती देण्याकरिता राज्य शासनातर्फे व्यक्ती विकास केंद्र-आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेसमवेत सामंजस्य करार करण्यात आला. या अंतर्गत राज्यातील २४ जिल्ह्यांतील शिवार जलयुक्त होणार आहेत. हॉटेल ताज येथे झालेल्या या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, श्री श्री रविशंकर उपस्थित होते. याप्रसंगी राज्यात नैसर्गिक शेती करण्यासंदर्भात व्यक्ती विकास केंद्रासमवेत कृषी विभागाने देखील सामंजस्य करार केला. ‘जलयुक्त शिवार २’ मध्ये ‘गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार’च्या कामासाठी मृदा व जलसंधारण विभागाच्या वतीने सामंजस्य करारावर सचिव सुनील चव्हाण आणि व्यक्ती विकास केंद्र-आर्ट ऑफ लिव्हिंग संस्था केंद्राचे अध्यक्ष प्रसन्न प्रभू यांनी स्वाक्षरी केली.

जलयुक्त शिवारच्या पहिल्या टप्प्यामध्ये महाराष्ट्रातील २२ हजार गावांमध्ये मोठे काम झाले. केंद्राच्या २०२० पाणी अहवालात महाराष्ट्रातील जलपातळी अन्य राज्यांच्या तुलनेत वर आल्याचा उल्लेख होता. यात आर्ट ऑफ लिव्हिंगचा सिंहाचा वाटा आहे. जलयुक्त शिवार दुसरा टप्पा राबवताना विषमुक्त शेतीचे अभियान हाती घेतले जाणार आहे. याद्वारे शेतकर्याच्या जीवनामध्ये आम्ही परिवर्तन करणार आहोत.

**- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

या जलयुक्त शिवारच्या कराराद्वारे राज्यातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, पुणे, अहमदनगर, लातूर, बीड, जालना, छत्रपती संभाजीनगर, नंदुरबार, धुळे, नाशिक, जळगाव, ठाणे, पालघर अशा २४ जिल्ह्यांतील ८६ तालुक्यात जलयुक्त शिवारची गाळ काढण्याची तसेच जलस्त्रोतांचे काम, नद्यांचे रुंदीकरण, सिमेंट बंधारे बांधणे, शेत तळ्यांची कामे होणार आहेत. हा कार्यक्रम तीन वर्षांच्या कालावधीचा असेल.




## दुसर्या टप्प्यातील कामांना मिळाली गती

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ग्लोबल वॉर्मिंगमुळे आज अनेक पर्यावरणाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत, त्यावर मार्ग काढणे गरजेचे आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना जलयुक्त शिवारच्या पहिल्या टप्प्यात चांगले यश मिळाले. सामंजस्य जलयुक्त शिवराच्या कामाला नैसर्गिक व सेंद्रिय शेतीची जोड देऊ शकलो, ही मोठी गोष्ट आहे. मिशन मोडवर आम्ही ‘जलयुक्त शिवार २’ टप्पा राबविणार आहोत. जालना जिल्ह्यात वाटुरमध्ये मी गेलो असताना जलयुक्त शिवारमुळे झालेली किमया पाहिली, असेही ते म्हणाले.

दै.विदर्भ प्रजासत्ताक अंक नि:शुल्क पाहिजे असल्यास आम्हाला तुमच्या नावासह टेक्स मेसेज किंवा व्हाट्सअप करा आमचा मो.नंबर ८६२४९८५६३३ संपर्क करा.

# रेल्वे स्थानकातील लिफ्टमध्ये अडकले प्रवासी

## पत्रकारांच्या सतर्कतेने निघाले बाहेर

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक धामणगांव रेल्वे,** लिफ्टमध्ये एक तास अडकलेले प्रवासी रेल्वे सल्लागार समिती सदस्य पत्रकार कमल छांगाणी व पत्रकार मनीष मुंदडा यांच्या सतर्कतेने सुखरुप बाहेर निघाले. मंगळवार, २८ नोव्हेंबरला सकाळी ६.३५ ला मुंबईवरून रेल्वे प्रवास करून धामणगाव रेल्वे स्थानकावर आलेले प्रवासी बाहेर जाण्यासाठी लिफ्टने निघाले. मात्र रेल्वे स्टेशनवरील लिफ्ट मध्येच अडकल्याने प्रवाशांची तारांबळ उडाली.




यातील एका प्रवाशाने ताबडतोब तेथील रेल्वे सल्लागार समिती सदस्य पत्रकार कमल छांगाणी व पत्रकार मनीष मुंदडा यांना फोन करून माहिती दिली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता स्टेशन अधीक्षक जे. डी. कुलकर्णी आणि रेल्वे पोलिस फोर्स पथकाला माहिती दिली. रेल्वे आणि आरपीएफ प्रशनासाने तत्काळ पाऊले उचलत त्रांत्रिक कर्मचार्यांच्या मदतीने दोन मजल्याच्यामध्ये अडकलेली लिफ्ट खाली आणून सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. प्रवाशांमध्ये यवतमाळ येथील पत्रकार अशोक बानोरे, प्रा. दीपक अंबरते, मंगेश पेठे आणि नरेंद्र गुप्ता यांचा समावेश होता. तब्बल एक तास प्रवाशांना लिफ्टच्या आतमध्ये राहावे लागले. रेल्वेची ही लिफ्ट अनेक वेळा नादुरुस्त असते. त्यामुळे या लिफ्टमध्ये असे प्रकार पाहावयास मिळतात. यापूर्वी सुद्धा अनेक प्रवाशांची अशाच प्रकारे तारांबळ उडालेली आहे.

स्टेशन प्रबंधक जे. डी. कुलकर्णी, रेल्वे सुरक्षा बलाचे पोलिस निरीक्षक छेदीलाल कनोजिया यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस उपनिरीक्षक शशिकांत गजभिये, उपनिरीक्षक मीना, हेड कॉन्स्टेबल संजय खंडारे, राहुल यादव, रेल्वे प्रशासनातील विद्युत विभागातील सत्यम दुबे, पॉईंटमन संजय काळे, प्रवीण यांनी मोलाची कामगिरी बजावली. यादरम्यान प्रवाशांमधील अंबर्ते यांनी रेल्वेच्या मदत केंद्रातील १३९ क्रमांकावर सुद्धा संपर्क केला. प्रवाशांना सुरक्षा जवानांनी रेल्वे पोलिस बल कार्यालयात आणून चहापान करून यथोचित सम्मान केला. प्रवाशांनीही रेल्वे अधिकारी, कर्मचारी आणि सुरक्षा बल पथकाचे आभार मानून आनंद व्यक्त केला. दरम्यान प्रवाशांनी रेल्वे सल्लागार समिती सदस्य पत्रकार छांगाणी व मुंदडा यांचेही आभार व्यक्त केले.

# जिल्ह्यात पावसाचा जोर कायम

## चोविस तासात २८ मिमी पाऊस

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्ह्यात रविवारी रात्रीपासून सुरू झालेला पाऊस अधून-मधून विश्रांती घेऊन मंगळवारच्या संध्याकाळपर्यंत सुरूच होता. या पावसाने खरीप व रब्बीतल्या पिकांना फटका बसला आहे. थंडीत कमालीच वाढ झाली आहे. जिल्ह्यात गेल्या २४ तासात २८.१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. पावसामुळे कुठे विपरीत घटना घडल्याचे वृत्त नाही.



सोमवारी व मंगळवारी पहाटे मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. दोन्ही दिवस सकाळ आणि दुपारच्या सत्रात पाऊस रिपरिप स्वरूपाचा होता. २८ नोव्हेंबरला सकाळी १० वाजता झालेल्या २४ तासात जिल्ह्यात सरासरी २८.१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. त्यात सर्वाधिक पाऊस चांदूरबाजार तालुक्यात ३६.९ मिमी झाला आहे. धारणी तालुक्यात १८.६, चिखलदरा ३१.३, अमरावती २५.८, भातकुली २७.४, नांदगाव खंडेश्वर ३१.१, चांदूर रेल्वे २७.१, तिवसा २२.७, मोर्शी ३२.७, वरूड १८.१, दर्यापूर ३४.७, अंजनगाव ३३, अचलपूर ३२.३, धामणगाव रेल्वे तालुक्यात १८.९ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

सलग दोन दिवसापासून येत असलेल्या पावसामुळे कपाशीच्या पिकाला फटका बसला असून हाती आलेला कापूस खराब झाला आहे. तुरीच्या पिकाचेही मोठे नुकसान झाले आहे. ढगाळ वातावरण असल्याने तुरीवर रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. नुकताच पेरणी झालेला हरभरा देखील अडचणीत आला असून गव्हाच्या पिकाला जास्तीचा पाणी धोक्याचा ठरू शकतो. आणखी दोन दिवस पावसाचा मुक्काम राहण्याची शक्यता वर्तविण्यात आल्याने शेतकर्यांची चिंता वाढली आहे. महसुल प्रशासनाने आज जो अहवाल तयार केला त्यात शेतीच्या नुकसानीची नोंद नाही. आठ घरांची अशत: पडझड झाल्याचे अहवालात नमुद आहे.

# वर्ध्यात बी. टी. देशमुखांच्या नावे विदर्भातील पहिले सभागृह

## इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज वर्धा येथे सभागृह

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक वर्धा** –महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्राला नवदिशा देणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व बी. टी. देशमुख होते. आपल्या आयुष्याच्या तीस वर्षाच्या कार्यकाळात महाराष्ट्राच्या विधान परिषदेच्या सभागृहात प्रा. बी. टी. देशमुखांनी शिक्षण विषय प्रश्नांना वाचा फोडून लोकशाही मार्गाने शिक्षण क्षेत्रातील लोकांना न्याय मिळवून देण्याचे महान कार्य केले. अशी कृतज्ञता व्यक्त करीत माजी आमदार व प्राध्यापकांचे नेते प्रा. बी. टी. देशमुख यांच्या कार्याची दखल घेत इंद्रप्रस्थ न्यु आर्ट कॉमर्स अॅंड सायन्स कॉलेज वर्धा येथील सभागृहाचे प्रा.बी.टी. देशमुख सभागृह असे नामकरण करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महिला विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जी. भोयर होते. नुटांचे पदाधिकारी डॉ. प्रविण सुर्यवंशी, डॉ. अनिल ढगे, डॉ. रविंद्र बेले, प्रा. नितीन कोगरे, प्रा. माने, प्रा. खटोले यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी डॉ. आर. जी. भोयर म्हणाले, प्रा.बी.टी. देशमुख यांनी आपल्या आयुष्यात शहरी भागातीलच नाहीतर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तसेच प्राध्यापकांच्या समस्या विधीमडंळासमोर मांडून महाराष्ट्र सरकारचे लक्ष वेधले. अशा या महान व्यक्तीचे कार्य नवीन पिढीसमोर यावे. हा उदात्त हेतू समोर ठेवून महाविद्यालयाने सभागृहाचे नामकरण त्यांच्या नावे केले ही अभिमानाची बाब आहे. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. संदीप पेटारे यांनी केले. या कार्यक्रमात नागपूर, अमरावती तसेच गोंडवाना विद्यापीठातील नुटांचे सदस्य उपस्थित होते.



# श्री हव्याप्र मंडळाच्या जिम्नास्टिकपटूंचा विक्रम

## आशियाई स्पर्धेत रौप्य पदक

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** नुकत्याच उजबेकीस्थान येथे पार पडलेल्या १३ व्या एशियन अॅक्रोबॅटिक्स जिम्नास्टिक स्पर्धेत येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जिम्नास्टिक विभागाचे हिमांशू जैन व क्रिष्णा भट्टड यांनी रौप्य पटक पटकावून देशाचे व मंडळाचे नावलौकिक केले. मंडळाचे जिन्मास्टिक विभाग प्रमुख व भारतीय संघ व्यवस्थापक प्रा. आशीष हाटेकर यासह या दोन्ही यशस्वी विजेते जिम्नास्टिकपटूंचा मंडळाच्यावतीने जंगी सत्कार करण्यात आला.

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे १३ व्या एशियन अॅक्रोबॅटिक्स जिम्नास्टिक स्पर्धेकरिता ऑगस्टमध्ये भारतीय संघाची निवड प्रक्रिया राबविण्यात आली होती. या निवड प्रक्रियेमध्ये मंडळाचे हिमांशू जैन व क्रिष्णा भट्टड यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करीत भारतीय संघामध्ये जागा मिळवली. प्रा. आशिष हाटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वरिष्ठ गट मिक्स पेअरमध्ये थक्क करणारे प्रदर्शन करीत रौप्य पदकाचे मानकरी ठरलेत.

मायदेशी परत येताच हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्यावतीने प्रा. आशीष हाटेकर, हिमांशू जैन व क्रिष्णा भट्टड यांचे जंगी स्वागत करून शहरातून विजयाची मिरवणूक काढत जल्लोष करण्यात आला. यावेळी विजेत्यांनी मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री



प्रभाकरराव वैद्य, मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके व मंडळाच्या सचिव व महाराष्ट्र हौशी जिम्नास्टिक संघाच्या उपाध्यक्ष तसेच जिल्हा जिम्नास्टिक संघटनेच्या सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके यांची भेट घेत आशीर्वाद घेतला.

# प्राथमिक शिक्षक समिती राज्याध्यक्ष विजय कोंबे यांची यवतमाळ येथे सभा

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक यवतमाळ** – महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा शाखा यवतमाळची नागपूर अधिवेशावर निघणाऱ्या ११ डिसेंबरच्या आक्रोश महामोर्चा संदर्भात आयोजित सभा समिती राज्याध्यक्ष विजयजी कोंबे यांचे उपस्थितीत सहकार भवन यवतमाळ येथे सोमवार ला पार पडली. नागपूर हिवाळी अधिवेशनावर शिक्षकांच्या ११ डिंसेबरला निघणार्या आक्रोश महामोर्चासाठी यवतमाळ मधून हजार च्या वर शिक्षक उपस्थित राहणार आहे करिता आजची सभा परिणामकारक ठरली. या सभेच्या अध्यक्षस्थानी शिक्षक



समितीचे जिल्हा नेते नानासाहेब नाकाडे,प्रमुख मार्गदर्शक समिती राज्याध्यक्ष विजयची कोंबे,शिक्षक नेते गजानन देऊळकर,किशोर सरोदे,शिक्षक समिती जिल्हाउपाध्यक्ष संजय काळे,१०९ पतसंस्था सचिव मुकेशभाऊ भोयर,ग्राहक भांडार अध्यक्ष आशन्ना गुंडावार,उपाध्यक्ष विजय लांडे,राज्य कार्यकारणी सदस्य नरेंद्र गाडेकर सर,जेष्ठ मार्गदर्शक बच्चूभाऊ भूत,माजी विस्तार अधिकारी निमकर साहेब, प्रशांत निभोरकर आदिंची उपस्थिती व्यासपीठावर होती.

या सभेसाठी पावसाळी वातवरण असतांना सुद्धां उमरखेड, पुसद, महागाव, दिग्रस, वणी,झरी,आर्णी, दारव्हा, बाभुळगाव, कळंब, घाटंजी, राळेगाव, पांढरकवडा, नेर या तालूक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी पांढरकवडा शाखेचे तालूकाध्यक्ष विजय मलकापुरे यांचा राज्याध्यक्ष विजयची कोंबे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला तसेच जुनी पेन्शन आघाडी जिल्हाप्रमुख म्हणून सुभाष पारधी तर उपजिल्हाप्रमुख म्हणून समिर डाखोरे यांची निवड सुद्धां यावेळी करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जुनी पेन्शन आघाडी राज्यप्रमुख प्रफुल्ल. पुंडकर यांनी केले तर आभार जिल्हा सरचिटणीस संदीप मोहाडे यांनी मांडले.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# बहिरम यात्रा २० डिसेंबरपासून

## लाखोंचे उत्पन्न देणार्या यात्रेत मात्र सुविधेचा अभाव

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक चांदूर बाजार,** संपूर्ण जिल्ह्यात भूषण ठरणारी सर्वात जास्त दीड महिना चालणारी बहिरम यात्रा २० डिसेंबरपासून सुरू होणार असून या यात्रेत सुख-सुविधा पुरवण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेकडे असते. मात्र जिल्हा परिषदेला लाखो रुपये उत्पन्न देणारी ही यात्रा असली तरी या यात्रेमध्ये येणार्या भाविक व व्यावसायिकांसाठी पाहिजे त्या सुविधा दिल्या जात नसल्याचे येथे येणार्या भाविकांच्या व व्यावसायिकांच्या चर्चेमधून स्पष्ट होत आहे. दिवाळीनंतर खरीप हंगाम संपला असून हिवाळ्याची सुरुवात झाली आहे. गुलाबी थंडीमध्ये मटणाची हंडी, त्यात बहिरम बाबाचे नवस फेडण्यासाठी व दर्शनासाठी विदर्भातून लाखो भाविक या



यात्रेमध्ये येत असतात. ही यात्रा २० डिसेंबर ते ३१ जानेवारीपर्यंत चालत असते. मागील वर्षी या यात्रेमध्ये ६७३ दुकानांच्या लिलावापासून जिल्हा परिषदेला २३ लाखाचे उत्पन्न झाले. हे उत्पन्न आतापर्यंत सर्वाधिक मानले गेले आहे. मागील वर्षी यात्रेतील सुविधांसाठी जिल्हा परिषदेने २ लाख ३५ हजार रुपये खर्च केला आहे. या परिसरातीलच नव्हे तर विदर्भातील अनेक भाविकांचे हे कुलदैवत मानले जाते. या यात्रेत आदिवासी बांधव देखील मोठ्या संख्येने उपस्थित असतात. यात्रेत येणार्यांची भाविकांची गर्दी पाहता कित्येक सुविधा पुरविण्यास जिल्हा परिषद अपयशी ठरवू लागली आहे. एकेकाळी शेतकर्यांची मानला गेलेली ही यात्रा आता हौशा-गौशांची झाली आहे. पण यात्रेत येणार्या भाविकांची गर्दी पाहता सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे.बहिरम यात्रेमध्ये स्वच्छतागृह असले तरी ते खूप जुने असल्यामुळे ते मोडकळीस आले आहे. त्यामुळे अद्यावत सुविधेसह कायमस्वरूपी शौचालयाचे बांधकाम होणे गरजेचे आहे. तसेच महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे या यात्रेमध्ये असणे आवश्यक आहे.

# भाजपाच्या राज्यात भाजपचाच खासदार असुरक्षित

## कॉंग्रेस प्रवक्ता अॅड. एडतकर यांची टिका

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** – भाजपाचे राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांच्यावर झालेला दगड हल्ला अत्यंत निषेधार्ह असून असा हल्ला लोकशाही व्यवस्थेस घातक आहे. या घटनेची विना विलंब चौकशी करण्यात यावी, अशी मागणी प्रदेश कॉंग्रेस प्रवक्ते दिलीप एडतकर यांनी केली असून भाजपाच्या राज्यात जिथे भाजपाचाच खासदार सुरक्षित नाही तिथे सर्वसामान्य माणसाची काय अवस्था असेल याची कल्पनाही न केलेली बरी असे सांगून या प्रकरणात कॉंग्रेस आमदार यशोमती यांच्याविरुद्ध पोलिसात तक्रार करणार्यांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते, असेही त्यांनी म्हटले आहे.



डॉ. बोंडे यांच्यावरच नव्हे तर कोणत्याही पक्षाच्या, कोणत्याही नेत्यावरच काय सर्वसामान्य कार्यकर्ता किंवा सर्वसामान्य माणसावरही असा हल्ला होणे निषेधाचीच बाब आहे. खा. बोंडे यांच्यावरील दगडफेक गृह खात्याच्या कारभाराच्या चिंधड्या उडाल्याचा स्वयंघोषित पुरावा आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गृह खाते अत्यंत कुचकामी ठरत आहे. गुन्हेगारी स्वरूपाच्या या घटनेचे भाजप राजकारण करीत असून डॉ. बोंडे यांच्यावर दगडफेक करणारा मग तो कुणीही असो त्याचा शोध घेऊन त्याला गजाआड करण्याची मागणी दिलीप एडतकर यांनी केली आहे. हा संपूर्ण प्रकार ड्रोन कॅमेरा बंदिस्त झाला असून २४ तास उलटून गेल्यानंतरही ड्रोनची चित्रफीत अद्याप पोलिसांना मिळालेली नाही. यावरून खरोखरच दगड फेक झाली की नाही याबाबत शंका आहे.याचीही चौकशी पोलिसांनी करावी.

# 'त्या' सभासदांविरोधात उपनिबंधकांकडे तक्रार

## नियमानुसार सभासद करण्याची रवींद्र गायगोले यांची मागणी

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** अमरावती जिल्हा मध्यवर्तो सहकारी बँकेमध्ये १९०५ नवे सभासद तयार करण्यात आले असून हे सभासद चुकीच्या पद्धतीने करण्यात आल्याचा आरोप बँकेचे संचालक रवींद्र गायगोले यांनी केला आहे. त्या सभासदांचे सभासदत्व नियमानुसार रद्द करून योग्य मागनि अर्ज केलेल्या अर्जदारांना सभासदत्व बहाल करावे, अशी मागणी त्यांनी विभागीय सहनिबंधकांकडे केली आहे.१८ सप्टेंबरला जिल्हा बँकेच्या सभेत

वैयक्तिक सभासद करून घेण्याबाबत कुठलाही प्रस्ताव नव्हता. मात्र त्यानंतर जिल्हाभर शेतकरी संस्थेच्या सभासदांनी वैयक्तिक भागधारक होण्यासाठी नियमाप्रमाणे डीडी काढले.बँकेच्या विद्यमान पदाधिकाऱ्यांनी व कार्य संचालकांनी आपल्या जवळच्या लोकांना सभासद करून घेतले, असा

आरोप त्यांनी केला. पदाधिकाऱ्यांनी आपल्या नातेवाईक व मर्जीतील लोकांना सभासद ठेवता यावे, यासाठी आमसभेत खोटा ठराव लिहिला. विशेष म्हणजे, योग्य मागनि अर्ज करणाऱ्यांना सभासदत्व न देता आपल्या मर्जीतील लोकांनाच सभासदत्व देण्यात आले, ज्यांचे अर्ज नाकारले त्या सर्वांचे अर्ज व डोडी १२ ऑक्टोबरच्या आर्चाचे असल्याने व त्यांनी बँकच्या भागाची रक्कम व प्रवेशशुल्क भरल्याने ते बँकेचे सभासद होण्यास पात्र ठरतात, त्यामुळे त्यांना सभासदत्व बहाल करावे, अशी मागणी रवींद्र गायगोले यांनी केली आहे.

# अंगणवाडीतील वॉटर फिल्टर उंदरांनी कुरतडले

## सात महिन्यांपासून होते वीजपुरवठाविनाच भिंतीवर लटकलेले

**दि२९ विदर्भ प्रजासत्ताकपथ्रोट** – येथील पंधरा अंगणवाडी केंद्रांपैकी सहा केंद्रांत लावण्यात आलेले वॉटर फिल्टर मागील सात महिन्यांपासून विद्युत पुरवठ्याविनाच भिंतीवर लटकलेले आहेत. त्यापैकी अंगणवाडी केंद्र ४५ मधील वॉटर फिल्टर उदरांनी पूर्णतः कुरतडले. सदर प्रकाराने चिमुकल्यांना शुद्ध पाण्याची सुविधा मिळणे तर सोडाच शासनाचा लाखोंचा खर्चही पाण्यात बुडाला आहे पथ्रोट घामपंचायत अंतर्गत एकूण पंधरा अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेतत्यामधील सहा अंगणवाडी केंद्रांत पोषण आहार तथा शिक्षणाचे धडे घेणाऱ्या चिमुकल्यांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून साधारणतः पत्रास हजार रुपये किमतीचे वीस लिटर क्षमतेचे वॉटर फिल्टर लावण्यात आले होले परंतु ते सुरू करण्यासाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा उपलब्ध करण्यात आलेला नव्हता, हे विशेष तर दुसरीकडे वॉटर फिल्टरसाठी आवश्यक असलेला पार्णापुरवठाही जोडण्यात आलेला नव्हता, केज, पाणी यासारखे दोन्ही अत्यंत आवश्यक घटक उपलब्ध करण्यात आले कहते, हेहो तितकेच विशेष

गावात पाणी पुरवठा करण्यातयेत असलेल्या पाइपलाइनवरून सदर अंगणवाडी केंद्रापर्यंत पाणी पोहोचविण्यात आले आहे. परंतु त्याची जोडणी अंगणवाडी केंद्रातील वॉटर फिल्टरला केलेली नाही, त्यामुळे केंद्रापर्यंत आलेल्या पाण्याचा उपयोग परिसरातील नागरिक घेत होते. पुढे तेही बंद झाले. या सर्व बाबींकडे संबंधित विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्यामुळे शासनाचा निधी वाया जात आहे. शिवाय समोर दिसत असलेल्या सुविधांपासून वंचित राहण्याची वेळ चिमुकल्यांवर आली आहे.



# हिवाळ्यात पावसाळा! महाराष्ट्रासह 'विदर्भात जोरदार पावसाची शक्यता

## IMD कडून अलर्ट जारी

**दि २९ विदर्भ प्रजासत्ताक पुणे** – राज्यासह देशात हिवाळ्यात पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे देशभरातील हवामानात मोठा बदल झाला आहे. आजही देशभरात विविध ठिकाणी पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे. भारतीय हवामान विभागाकडून आज महाराष्ट्र, तामिळनाडू, मध्य प्रदेशसह अनेक राज्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर काही भागात ढगाळ वातावरणासह रिमझिम पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. देशभरात विविध ठिकाणी हवामान विभागाकून अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता**

अंदमान-निकोबार बेटांसह बर्याच ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण अंदमान समुद्र आणि लगतच्या अंदमान निकोबार बेटांवर आज २५ ते ३५ किमी प्रतितास वेगाने वाऱ्याचा वेग ४५ ते ४५ किमी वेगाने वाहण्याची शक्यता आहे. ईशान्य मान्सून राज्याच्या दक्षिण भागात सक्रिय झाला आहे. तामिळनाडू, पुडुचेरी आणि कराईकल परिसरात काही ठिकाणी गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह अनेक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.



दरम्यान, बुधवारी पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये सकाळी ८:३० वाजता पश्चिमेकडे सरकले सकाळच्या वेळी दाट धुक्यासारखी स्थिती राहण्याची अपेक्षा आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अंदमान समुद्रालगत कमी दाबाचे क्षेत्र मंगळवारी आणि दक्षिण अंदमान समुद्रावर पसरलं आहे. कमी दाबाचे क्षेत्र पश्चिम आणि वायव्य दिशेकडे सरकण्याची शक्यता आहे. ३० नोव्हेंबरच्या सुमारास आग्नेय बंगालच्या उपसागरावर दबाव वाढण्याची शक्यता आहे. त्यानंतर हे दबाव वायव्येकडे सरकून दक्षिण-पूर्व बंगालच्या उपसागरात ४८ तासांत चक्रीवादळ तीव्र होण्याची अपेक्षा आहे. यामुळे देशभरात विविध ठिकाणी अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे.

**महाराष्ट्रासह 'या' भागात पावसाचा अंदाज**

भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, आज जम्मू काश्मीर हिमाचल प्रदेश उत्तराखंड मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आज पावसाची शक्यता आहे. तर, तामिळनाडू पुद्दुचेरी कराईकल केरळआणि माहे येथे पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या भागात वादळी वारा आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# रेल्वे सुरक्षा बलाच्या 'मिशन जीवन रक्षक' ने वाचविले ६६ लोकांचे प्राण

## एप्रिल ते ऑक्टोबर २०२३ दरम्यान कार्यवाही

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**–मध्य रेल्वे मुंबई विभागाच्या रेल्वे प्रोटेक्शन फोर्स (आरपीएफ) ही रेल्वे मालमत्तेचे रक्षण करण्यासह प्रवाशांच्या प्राणांचे रक्षण, पळून गेलेल्या मुलांचे रेस्क्यूअर्स आणि लगेज रिट्रीव्हर अशा अनेक भूमिका बजावतात. त्यानुसार एप्रिल-ऑक्टोबर २०२३ या कालावधीत आरपीएफ जवानांनी 'मिशन जीवन रक्षक' अंतर्गत स्वतःचा जीव धोक्यात घालून ६६ जणांचे प्राण वाचविले आहेत. यामध्ये मुंबई विभागात १९, भुसावळ विभागात १३, नागपूर विभागात १४, आणि सोलापूर विभागात ५ पुणे विभागात १५ जणांचा समावेश आहे. आरपीएफच्या सतर्कतेने बहुतेक प्रकरणांमध्ये अशा प्रवाशांचे प्राण वाचविले आहेत. प्रवाशी निष्काळजीपणा करतात आणि धावत्या ट्रेनमध्ये चढताना किंवा उतरताना धोक्याचा सामना करतात. काही वेळा विविध वैयक्तिक कारणांमुळे आत्महत्येचा प्रयत्न करताना जीव वाचविला आहे.रेल्वे मालमत्तेचे रक्षण करण्याच्या मुख्य कर्तव्याव्यतिरिक्त 'अमानत' या ऑपरेशन अंतर्गत आरपीएफने

रेल्वे संरक्षण दलाच्या जवानांना प्रवासी आणि रेल्वे मालमत्तेवरील गुन्हे, अतिरेकी हिंसाचार, ट्रेनच्या वाहतुकीला अडथळा आदी विविध सुरक्षा आव्हानांनाही तोंड द्यावे लागते. अत्यंत समर्पण सतर्कतेने आणि धैर्याने आरपीएफ आपली कर्तव्ये पार पाडतात. त्यामुळे प्रवाशांनी धावत्या ट्रेनमधून चढू नये किंवा उतरू नये. जीव अमूल्य आहे.– **शिवाजी मानसपुरे,** जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे



### मध्य रेल्वेच्या आरपीएफने २.७७ कोटींचे प्रवाशांचे सामान केले परत

त्यांच्या कर्तव्याच्या पलीकडे जाऊन गरजू प्रवाशांना मदत केली आहे आणि त्यांचे हरवलेले किंवा मागे राहिलेले सामान, मोबाईल फोन, लॅपटॉप, यासारख्या मौल्यवान वस्तू, प्रवाशांचे दागिने, रोख आदी परत मिळवून दिले आहेत. एप्रिल ते ऑक्टोबर २०२३ या चालू आर्थिक वर्षात, ऑपरेशन 'अमानत' अंतर्गत, आरपीएफ ने सुमारे ८५७ प्रवाशांचे २.७७ कोटी रुपयांचे सामान परत मिळवून दिले आहे. या ८५७ प्रवाशांपैकी ३७७ प्रवाशांचे १.६३ कोटी रुपयांचे सामान एकट्या मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात परत मिळवण्यात आले. यात भुसावळ विभाग १८२ प्रवाशांचे ५०.४५ लाखांच्या किमतीचे सामान; नागपूर विभाग १६८ प्रवाशांचे ३६.९७ लाख रूपये किमतीचे सामान; पुणे विभाग ५८ प्रवाशांचे १३.९४ लाख रूपये किमतीचे सामान; सोलापूर विभाग ७२ प्रवाशांचे १३.९९ लाखांच्या किमतीचे सामानांचा समावेश आहे.

# गंधार कुलकर्णी यांचा 'पद्यस्पर्श' हा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशित



### देवनाथ मठाचे पीठाधीश्वर प. पू. श्री. जितेंद्रनाथ महाराज मठात झाला सोहळा

**दि२९ विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर** अचलपूर शहराला साहित्याची फार जुनी परंपरा लाभलेली आहे आणि ही परंपरा सातत्याने चालू ठेवण्यासाठी जुळ्या शहरातील अनेक तरुण साहित्यिक समोर येत आहेत. यातीलच एक नाव म्हणजे गंधार विश्राम कुलकर्णी. नवोदित वक्ता, लेखक, कवी म्हणून गंधार कुलकर्णी यांचे नाव प्रसिद्ध आहे. रविवार, दि. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी गंधार कुलकर्णी यांचा 'पद्यस्पर्श' हा दुसरा काव्यसंग्रह अंजनगाव सूर्जी येथील श्री. देवनाथ मठामध्ये प्रकाशित झाला. पुस्तकाचे प्रकाशन देवनाथ मठाचे पीठाधीश्वर प. पू. श्री. जितेंद्रनाथ महाराज व पू. सौ. माई यांच्या शुभहस्ते झाले. या प्रसंगी कुलकर्णी परिवारासोबत डॉ. नितीन सराफ, प्रकाशक श्री. सचिन सुकलकर व सौ. प्रिया सुकलकर, श्री. पुष्पक भिरंगी उपस्थित होते. २०१९ साली गंधार कुलकर्णी यांचा 'काव्यतरु' हा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला होता. त्यानंतर गंधारने लिहिलेल्या कवितांचा 'पद्यस्पर्श' हा काव्यसंग्रह आहे. या प्रकाशन सोहळ्याची सुरवात श्री. विश्राम कुलकर्णी व डॉ. सौ. जयश्री कुलकर्णी यांनी प. पू. गुरुजींचे पूजन करून केली. त्यानंतर पू. गुरुजी व सौ. माई यांच्या शुभहस्ते 'पद्यस्पर्श'चे विमोचन झाले. 'पद्यस्पर्श'चे विमोचन करतांना प. पू. श्री. जितेंद्रनाथ महाराजांनी गंधारच्या कवितांमध्ये भाव आणि स्पृहण दोन्हींचा समन्वय आहे असे सांगितले. यानंतर 'पद्यस्पर्श'चे प्रकाशक श्री. सचिन सुकलकर व सौ. प्रिया सुकलकर आणि प्रमुख अतिथी डॉ. नितीन सराफ यांचा जितेंद्रनाथ महाराजांनी सत्कार केला. प्रकाशन सोहळ्याची सांगता गंधार कुलकर्णी यांच्या काव्यवाचनाने झाली.

'पद्यस्पर्श' या काव्यसंग्रहाला प. पू. गुरुजींचे आशीर्वचन लाभले आहे, सोबतच 'पद्यस्पर्श'तील कवितांना साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखिका डॉ. मंजूषा कुलकर्णी यांनी प्रस्तावना दिलेली आहे. साहित्य क्षेत्रातील गंधारची वाटचाल यशस्वी होण्यासाठी ज्येष्ठ कादंबरीकार व समीक्षक डॉ. रवींद्र शोभणे यांनी काव्यसंग्रहाला शुभेच्छा दिल्या आहेत. अशा सर्व ज्येष्ठ व श्रेष्ठ मंडळींच्या शुभेच्छा व आशीर्वादांमुळे पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्तमरित्या संपन्न झाला.

# आता अमरावतीमध्ये ही दुकानाच्या पाट्या मराठीतच

## महापालिका उपायुक्त जुम्मा प्यारेवाले यांचा आवाहनवजा इशारा

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**– दुकानांवरील नावाच्या पाट्या मराठी भाषेत असाव्या, असे आदेश नुकताच सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे. त्यानुसार आता दुकाने किंवा विविध आस्थापनांवरील नामफलक मराठी देवनागरी लिपितच लावण्याची आवाहनवजा सूचना महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे. याबाबतचे पत्र उपायुक्त (सा) जुम्मा प्यारेवाले यांनी जारी केले आहे. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना(नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम २०१७ अन्वये प्रत्येक आस्थापनेचा नामफलक हा मराठी देवनागरी लिपितच असावा आणि तो सर्वात वर लिहीणे आवश्यक आहे. सोबतच महाराष्ट्र नवनिर्माण सेना व शिवसेनेही दुकानांवरील मराठी पाट्यांसाठी राज्यभरात मोठे आंदोलन उभारले होते.



गत कित्येक वर्षांपासून मराठी पाट्यांचा वाद सुरू आहे त्या पाश्र्वभूमीवर अमरावतीत महापालिकेकडून त्याबाबतची सूचना मंगळवारी जारी केली. त्यानुसार मराठी भाषेतील नामफलकांवरील अक्षरांचा आकार इतर भाषेतील अक्षरांच्या आकारापेक्षा लहान असू नये. सबब सर्व आस्थापना व दुकानधारकांनी सदर नियमानुसार नामफलक हा प्रारंभी मराठी देवनागरी लिपित लिहुन प्रदर्शित करावा, अन्यथा कायद्यात नमुद केल्यानुसार संबंधित दुकानचालकांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

# काँग्रेसच्या अल्पसंख्याक सेलची तालुका कार्यकारिणी जाहीर



**पक्ष बळकट करण्यासाठी काम करा: आ. यशोमती ठाकूर**

कोणतीही जबाबदारी लहान, मोठी नसते, तर प्रत्येकाने आपसातील कोणतेच मतभेद न ठेवता पक्ष बळकट करण्यासाठी एकदिलाने काम केले पाहिजे. येणारा काळ हा कसोटीचा आहे. सर्वसामान्य नागरिकांची कामे करुन त्यांना सहकार्य करा, यावेळी आ. यशोमती ठाकूर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**– अमरावती, भातकुली तालुका व तिवसा विधानसभा अल्पसंख्याक सेलची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यावेळी नवनियुक्त पदाधिकारी यांना आमदार ॲड.यशोमती ठाकूर व अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष मुकद्दर खा पठाण यांच्या हस्ते नियुक्तपत्र प्रदान करण्यात आले. अमरावती तालुकाध्यक्षपदी शेख जमीर, भातकुली तालुकाध्यक्षपदी अब्दुल अलीम अब्दुल तमीज यांची तर तिवसा विधानसभा महासचिवपदी अ. वसीम शे. अफसर कुरेशी यांची नियुक्ती करण्यात आली. शहर अध्यक्षपदी अजीम खान खलील खान यांची निवड करण्यात आली. यावेळी अमरावती जिल्हा अल्पसंख्याक सेलुलाचे अध्यक्ष – मुकद्दर खा पठाणे यांच्यासह – महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव आसिफ तवक्कल, नसीम खान,शहीद सौदागर, शेख साबीर शेख जफर, मो. जुनेद, अब्दुल रहेमान कुरेशी, सोनू पठाण, अनिस मिर्झा, शेख जलील, प्रमोद तसरे, रमजान शाह, शैलेश दुपारे, घनश्याम बोबडे, अब्दुल शाह, शफा शाह, प्रशांत पाटील, इलियास भाई, मो. जुनेद, इम्रान शहा, गोलू गोल्डन, विठ्ठल मोहोड, शादिकभाई, गफ्फारभाई आदी उपस्थित होते.

# राज्य नाट्य स्पर्धेत सादर झाले माणुसकी

## पावसामुळे उपस्थिती थंडावली

**दि२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**– ६२ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धे मधे अमरावती केंद्रावरील प्राथमिक फेरीत दि. २८ रोजी विनोद सुरोसे, अमरावती लिखित आणि नंदिता विखार दिग्दर्शीत माणुसकी नाटक सादर करण्यात आले. अमरावती मधे सुरु झालेल्या बोचाऱ्या थंडीत या नाटकाला रसिकांची उपस्थिती सुद्धा थंडावलेली जाणवली . सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि संचालक सांस्कृतिक कार्य बिभीषण चावरे यांचे मार्गदर्शनात स्पर्धेची ही प्राथमिक फेरी संपूर्ण महाराष्ट्रात सुरु असून या मालिकेत आज आणखी एक पुष्प ओवल्या गेले. पडदा उघडतो तेंव्हा रंगीला सिनेमातल्या गाण्यावर सोनू नृत्य करत असते आणि मग प्रवेश होतो तिच्या विद्यार्थी जीवनातील मैत्रिणीचा म्हणजे पुजाचा . दोघींच्या संवादतून स्त्रियांवर होणारे अत्याचार, त्यांना सामोरे जावे लागणाऱ्या समस्या, प्रेमाभंगातून उद्भवणाऱ्या घटना अश्या विविध बाबीवर अनाकलनीय चर्चा होते आणि जेमतेम ३० मिनिटात पहिला अंक संपतो. सोनू आणि पूजा असे दोनच पात्र या कलकृती मधे आहेत. सोनूची भूमिका नंदिता विखार हिने तर पुजाची भूमिका चांदणी बांगर यांनी साकारली आहे. आजपर्यंत च्या रसिकच्या उपस्थिती ला आज



अचानक वाढलेल्या थंडी आणि पावसामुळे नजर लागल्याचे जाणवले. माणुसकी या नाटकाची निर्मिती श्री वैष्णवी महिला व आदिवासी विकास संस्था , अमरावती यांची असून दिग्दर्शन नंदिता विखार यांचे आहे. तांत्रिक बाजू म्हणजे नेपथ्य विनोद कृष्णराव विखार ,यांनी तर संगीत नियोजन निहाल गवई , रंगभूषा – अर्चना विखार , वेशभूषा – हर्षल विखार , प्रकाश योजना – मनिष इंगळे यांनी सांभाळली. आज बुधवार दि. २९ रोजी सरकार संस्था, अमरावती निर्मित, चंद्रशेखर फणसळकर लिखित व प्रसाद कुलकर्णी दिग्दर्शीत खेळीमेळी' हे नाटक संत ज्ञानेश्वर नाट्य गृहात सायंकाळी ठीक ७.०० वाजता सादर होईल. रसिक प्रेक्षकांनी कृपया नोंद घ्यावी अशी विनंती स्पर्धा समन्वयक ॲड. चंद्रशेखर डोरले आणि सहसमन्वयक श्रद्धा पाटेकर व विशाल फाटे यांनी केले आहे.

आता लोकप्रिय असलेल्या सांध्य दैनिक

विदर्भ प्रजासत्ताक

मध्ये छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा

मो.८६२४९८५६३३

घर विकणे,नोकरी विषयक,सहल यात्रा,पाहिजेत,भाड्याने देणे आहे या प्रकारच्या छोटी जाहिरात१० ओळीची मिनी ऍड फक्त ५०/- रु मध्ये प्रति दिवस तेही बोल्ड बॉक्स मध्ये चार दिवसानंतर एक दिवस फ्री..

# बसमध्ये जागा पकडण्यासाठी कसरत कशाला? काढा ऑनलाइन तिकीट

## परिवहन महामंडळाची सुविधा : दिवाळीत अनेकांनी घेतला ऑनलाइन आरक्षणाचा लाभ



**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

धावपळ करीत बसस्थान गाठायचे. सामान आवरत बसमध्ये चढायचे, त्यातच जागाच मिळत नाही. अशी परिस्थिती नेहमीच प्रवाशांसंबंधी उद्भवते. मात्र, ऑनलाइन तिकीट बुक केल्यास आपणाला आरामात बसून प्रवास करता येतो. अनेकजण हा पर्याय अवलंबत आहेत.

दिवाळीच्या दिवसात ऑनलाइन तिकीट बुकिंगमधून तब्बल दीड ते दोन लाखांचे उत्पन्न अमरावती विभागाला मिळाले आहे. दिवाळीच्या काळात बसमध्ये प्रचंड गर्दी असते. ही गर्दी टाळण्यासाठी अनेकांनी ऑनलाइन तिकीट बुकिंगला पसंती दिली, कुणी मोबाइलद्वारे, कुणी बसस्थानकावरील काऊंटर वर तिकीट बुकिंग करता येते

### एमएसआरटीसीवर काढा ऑनलाइन तिकीट

एमएसआरटीसीच्या वेबसाइटवर ऑनलाइन पद्धतीने तिकीट बुकिंगची सुविधा २४ तास उपलब्ध आहे. तिकीट दरात सूट तसेच निःशुल्क तिकीट असलेले ऑनलाइन बुकिंग मोबाइलवरून किवा बसस्थानकात करू शकता.

# सहकार क्षेत्रात २५ डिसेंबरला निवडणुकीचा उडणार बार

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :**

महात्मा फुले अर्बन को-ऑपरेटिव्ह बैंक व आयटीआय निदेशक कर्मचारी सहकारी पतसंस्था यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम सहकार विभागाने जाहीर केला आहे. येत्या २५ डिसेंबरला या दोन्हींच्या निवडणुका होत असून, नवीन संचालक मंडळ कार्यरत होणार आहे.

नामनिर्देशन २२ नोव्हेंबर रोजी सुरू झाले. २९ नोव्हेंबरपर्यंत इच्छुकांना अर्ज घेता व दाखल करता येणार आहेत. अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांची यादी याच कालावधीत प्रसिद्ध होणारअसून, छाननी ३० नोव्हेंबरला व १ डिसेंबरला पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जाहीर केली जाईल. १ ते १५ डिसेंबरपर्यंत निवडणूक रिंगणातून माघार घेण्याची मुदत आहे. त्यानंतर निवडणूक चिन्हासह उमेदवारांची अंतिम यादी १८ डिसेंबरला जाहीर होणार आहे. २५ डिसेंबरला दोन्हींसाठी मतदान घेण्यात येणार आहे. दुसऱ्या दिवशी २६ डिसेंबरला महात्मा फुले अर्बन को-ऑप.ची, तर आयटीआय निदेशक क गरी सहकारी पतसंस्थेची २५ डिसेंबरलाच मतमोजणी करण्यात येणार आहे.

# आडकुजी महाराज पुण्यतिथी निमित्य जीवन आधार रुग्णवाहिका व शवपेटी लोकार्पण सोहळा संपन्न

## वरखेड येथे जीवन जवंजाळ यांच्या माध्यमातून सेवेकरिता रुग्णवाहिका व शिवपेटी भेट
## हजारो नागरिकांच्या उपस्थितीत रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा संपन्न

**दि२९ विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**

उतू नको मातू नको घेतला वसा टाकू नको असे म्हटल्या जाणाऱ्या म्हणी ला जपत जीवन आधार सामजिक संस्था पूर्ण विदर्भातील आपल्या सेवेतून मोठ्या प्रमाणात काम करत आहे गोर गरीब परिवार यांच्या चेहऱ्यावर आनंद कसा फुलवला जाईल या करिता दिवस रात्र गोर गरीब अपंग अनाथ परिवार यांना रुग्णसेवत मध्ये आधार देऊन एक मदतीचा आधार देण्याचे सर्वात मोठे कार्य सध्या जीवन आधार संस्थेचे अध्यक्ष जीवन जवंजाळ व त्यांचे सर्व सेवक काम करत आहे त्या निमित्ताने श्रीक्षेत्र वरखेड येथे राष्ट्रसंत गुरूदेव आडकोजी महाराज यांच्या १०२ व्या पुण्यतीथीचे औचीत्त्य साधुन जीवन आधार सामाजिक संस्था नागपूर संस्थापकअध्यक्ष जीवन जवंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्नवाहीका लोकार्पण व शवपेटी सोहळा भेट देऊन पार पडला..या सोहळ्याला जीवन आधार



संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री जीवन जवंजाळ , सचिव सुभाष सांगोले, सहसचिव सुयोग गोरले , पत्रकार सागर सवळे, जेष्ठ पत्रकार सुरेश सवळे, गणेश पाटील फिल्म निर्माता, निखिल सातपुते, व गावातील सर्व नागरिक यांच्या उपस्थित लोकार्पण सोहळा संपन्न झाला गोर गरीब अपंग अनाथ बेघर रुणाला सेवा मिळावी या करिता मोफत ऑपरेशन , म्बुलन्स सेवा ही कसी करता येईल हा उद्देश मनामध्ये ठेवून जीवन आधार सामाजिक संस्था निस्वार्थ अंतकरणाने सेवा देऊन काम करत आहे त्यानिमित्ताने वरखेड येथे म्बुलन्स व शवपेटी भेट देऊन मदत करण्यात आली या वेळी उपस्थित आडकोजी महाराज संस्थानचे अध्यक्ष चंद्रमोहन बोके अभिजीत बोके.दिवाकरराव दळवी. प्रेमकुमार बोके. एकनाथराव बोके तथा जीवन आधार सामाजिक संस्था तिवसा तालुका चे अध्यक्ष राजुभाऊ देशमुख मोहन अग्रवाल चंद्रशेखर कडू.अजय वानखडे निरेन बेलुरकर.दिपक टरके.अनुप वानखडे.अंकुश बोके.जयकूमार बोके...योगेंन्द्र बोके.गौरव दळवी. व सर्व जीवन आधार संस्थेचे सदस्य व सर्व वरखेड तथा आसपासच्या ग्रामातील लोक उपस्थित होते. ही रूग्नवाहीका व शवपेटी बघण्याकरीता आमदार यशोमतीताई ठाकुर.प्रहारचे संजय देशमुख यासारख्या अनेक मान्यवरांनी भेटी देऊन.संस्था राबवीत असलेल्या ऊपक्रमाची स्तुती केली.समस्त वरखेड ग्राम तथा तिवसा तालुका या स्तुत्य ऊपक्रमाबद्दल जीवन आधार संस्थेचे आभार मानत आहे.

# ग्रामीण भागातव सौरपंपाला 'प्रेशर' येईना अन् थेट वीजपुरवठाही मिळेना

## योजनेची अंमलबजावणी धिम्या गतीने : कमी पॉवरच्या पंपामुळे अडचण

**दि२९ विदर्भ प्रजासत्ताक मेळघाट**

अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांपैकी सौर ऊर्जा हा स्त्रोत शाश्वत आणि निरंतर आहे. त्यामुळे राज्य सरकारने सौर कृषीपंप देण्याची योजना अंमलात आणली. जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. मात्र अनेक अडचणी असल्याने जिल्ह्यात या अंमलबजावणीला गती नाही. योजनेच्याअलिकडे वीज वितरण कंपणीचे बिल मोठ्या प्रमाणात येत आहे. त्यातल्या त्यात वीज पुरवठ्याचा लपंडाव, भारनियमन आदींमुळे विद्युत वाहिणीवरील कृषीपंप योजना प्रभावित होत आहे. याला पर्याय म्हणून सरकारने सौर कृषीपंप योजना अंमलात आणली. मात्र या योजनेत उपलब्ध होत असलेले पंप पॉवरफूल नसल्याने शेतक-यांना त्रास होत आहे.



### लाभासाठी अशी आहे अट

अतिदुर्गम भागातील, विद्युतीकरण न झालेल्या भागातील शेतकऱ्यांसाठी पैसे भरूनही तांत्रिक कारणांमुळे वीज पुरवठा होत नाही. असे शेतकरी सौरकृषीपंप योजनेसाठी पात्र आहेत. लाभार्थी स्वतः जमिनीचा मालक असावा, शेतजमिनीचे क्षेत्र पाच हजार पेक्षा अधिक नसावे.

### जिल्हास्तरीय समितीचे नियंत्रण

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती आहे. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी तर अधीक्षक अभियंता महावितरण हे सदस्य सचिव आहेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वरिष्ठ वैज्ञानिक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा हे सदस्य आहेत.

# गुलाबी थंडी झाली रोगट; थंडी, पाऊस व ढगाळ वातावरणाचा शरीरावर परिणाम

**दि. २९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

हिवाळा हा ऋतू आरोग्यास लाभदायक असतो. मात्र, ढगाळ वातावरण, पाऊस आणि वाढलेल्या थंडीमुळे तो रोगट ठरत आहे. वातावरणातील बदलांमुळे विविध आजारांच्या रुग्णांत वाढ झाली आहे. विशेषत: बालकांना सर्दी, खोकला, ताप, दमा, न्यूमोनिया, मोठ्यांमध्ये वाढलेला संधिवाताचा त्रास, तर ज्येष्ठांमध्ये कंबरदुखी, मणक्यांचे आजार बळावले आहेत. हिवाळा हा अनेकांसाठी सर्वाधिक प्रतीक्षेत असलेला ऋतू. सुट्ट्या साजऱ्या करण्यापासून ते कौटुंबिक सहलीपर्यंत कितीतरी कारणांनी या ऋतुचा आनंद लुटला जातो. मात्र, सध्या प्रमाणाबाहेर घसरलेला पारा, ढगाळ वातावरण, त्यात पावसाची पडलेली भर, यामुळे विविध आजारांची डोकेदुखी वाढली आहे.

# सातव्या वेतन आयोगाचा दुसरा व तिसरा हप्ता लवकर द्या

## शिक्षक महासंघाचे अध्यक्ष शेखर भोयर यांनी केली शालेय शिक्षण मंत्र्यांकडे मागणी



**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

सातव्या वेतन आयोगाचा दुसरा व तिसरा हप्ता मिळणेबाबत शिक्षक महासंघाचे अध्यक्ष शेखर भोयर यांनी शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकरयांना नुकतेच निवेदन दिले.

शासन निर्णयानुसार माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत डि.सी.पी.एस. धारक कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाचा दुसरा व तिसरा हप्ता रोखीने देण्यात यावा असा स्पष्ट शासन निर्णय असुन सुध्दा अद्यापपर्यंत राज्यातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा दुसरा व तिसरा हप्ता मिळाला नसून तात्काळ देण्यात यावा असे निवेदनात नमूद केले आहे. शिक्षकांच्या प्रश्नांसाठी नेहमी आग्रही भूमिका घेणारे शिक्षक महासंघाचे अध्यक्ष शेखर भोयर हे नेहमी शिक्षकांचे प्रश्न मंत्री महोदयांना भेटून निकाली काढतात. आता सातव्या वेतन आयोगाचा दुसरा व तिसरा हप्ता रोखीने देण्यात यावा यावर सुद्धा तोडगा काढण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी भोयर यांना दिले आहे.

# जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती
# अंमली पदार्थ प्रतिबंधासाठी काटेकोर कार्यवाही करा



**दि२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

रसायन निर्मिती कारखान्यांतून अंमली पदार्थाचे उत्पादन होऊ नये यासाठी नियमित तपासणी करून त्याबाबत अहवाल सादर करावा. तसेच जिल्ह्यात अंमली पदार्थांचा प्रतिबंधासाठी सर्व विभागाने काटेकोर कार्यवाही करावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांनी केले.अंमली पदार्थांच्या वापरावर प्रतिबंध घालण्यासाठी पोलिस आयुक्तालयाकडून जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती गठित करण्यात आली आहे. या समितीच्या सदस्यांची पोलिस आयुक्तालयात आज बैठक झाली. यावेळी अन्न व औषध प्रशासनचे औषध निरीक्षक स्वाती भरडे, तहसिलदार डॉ. प्रशांत पडघन, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अरविंद गभणे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.औषध विक्रेत्यांकडून अनेकदा प्रिस्किप्शनशिवाय औषधे दिली जातात. बंदी घातलेल्या औषधांतील काही ठराविक घटक असलेली वेगळी औषधेही निरनिराळ्या नावाखाली उपलब्ध असतात. त्यामुळे डॉक्टरांच्या प्रिक्रिप्शनशिवाय औषधांची विक्री होता कामा नये. याबाबत मेडिकल स्टोअर्सची नियमित तपासणी करावी. टपाल विभागाने पार्सल प्राप्त करणाऱ्याची चौकशी करुन व त्या पार्सलमध्ये काय आहे याची तपासणी करुनच संबंधित व्यक्तीला पार्सल सुपूर्द करावे. बंद पडलेल्या कारखान्यांत अनेकदा रात्रीच्या वेळी अवैध उत्पादन निर्मितीचे प्रकार पूर्वी घडले आहेत. तसे घडू नये, यासाठी वेळोवेळी तपासण्या करावे. तसेच कंपनीत कोणत्या पदार्थाचे उत्पादन होते व त्यात काही इतर रसायने मिसळून अंमली पदार्थ तयार होतात का, याची खातरजमा करावी. तसा अहवाल प्रशासनाला सादर करावा.

अंमली पदार्थांचे मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम, टपालाच्या माध्यमातून अंमली पदार्थांची मागणी व पुरवठा होणार नाही तसेच जिल्ह्यात खसखस किंवा गांजा पिकाची अवैध लागवड होणार नाही याची दक्षता घेणे, व्यसनमुक्ती केंद्रांशी समन्वय राखणे, दाखल झालेल्या व्यक्तींना कोणत्या अंमली पदार्थांचे व्यसन आहे याबाबतची माहिती, अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती अभियान राबवणे, पोलीस, अंमली पदार्थ नियंत्रण ब्युरो व राज्य उत्पादन शुल्क यांनी केलेल्या कारवायांच्या माहितीचा डेटाबेस तयार करणे, अंमली पदार्थांविरुध्द गुन्हे व करावयाची कार्यवाहीबाबत यावेळी आढावा घेण्यात आला.

# पारधी समाजाला अधिक सक्षम करावे : प्रभुणे

## प्रज्ञा प्रबोधिनीचा कार्यक्रम

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

उपेक्षित जीवन जगणार्या पारधी समाजाच्या मुलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रज्ञा प्रबोधिनीचे सलग २० वर्षापासून सुरू असलेले कार्य प्रशंसनीय आहे. या कार्याचे सकारात्मक परिणाम समोर येत आहे. राज्याच्या विविध भागात विखुरलेल्या पारधी समाजाला सक्षम करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने अधिक प्रयत्न करावे लागतील, अशी अपेक्षा समरसता गुरूकुलम् पुणेचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी व्यक्त केली.

प्रज्ञा प्रबोधिनी, अमरावतीच्या द्विदशकपूर्ती, उद्योजकता विकास प्रकल्प, विवेकानंद छात्रावास लोकार्पण सोहळा मंगळवार २८ नोव्हेंबरला माऊली पॉईंट सभागृहात आयोजिण्यात आला होता. त्यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी विदर्भ प्रांत संघचालक राम हरकरे, एबीपी माझाच्या उपकार्यकारी संपादक सरिता कौशिक, विनोद बापट प्रमुख



अतिथी म्हणून तर प्रज्ञा प्रबोधिनीचे अध्यक्ष अविनाश देशपांडे व सचिव मुकुंद पांडे उपस्थित होते. खा. अनिल बोंडे यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावून त्रिवेणी बोंडे चॅरीटेबल ट्रस्टतर्फे प्रबोधिनीला १ लाखाची मदत जाहीर केली. याशिवाय श्री नरकेसरी प्रकाशनच्या संचालीका मीरा कडबे, भाजपाच्या माजी अध्यक्ष निवेदीता चौधरी, किरण पातुरकर यांच्यासह इतर मान्यवरांनी कार्यक्रमाला हजेरी लावली.

राम हरकरे मार्गदर्शनात म्हणाले, समाज परिवर्तनासाठी प्रज्ञा प्रबोधिनीचा हा चांगला उपक्रम आहे. प्रामाणिपणे काम केले तर चांगले काम उभे राहते. प्रज्ञा प्रबोधिनी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. सरिता कौशिक म्हणाल्या, प्रज्ञा प्रबोधिनीचे कार्य मोठे आहे. संस्कार, सेवा, शिक्षणातून पारधी समाजाच्या मुलांमध्ये बदल होतो आहे. उद्योजकता प्रकल्प अधिक फायद्याचा ठरेल. तत्पूर्वी प्रबोधिनीच्या मुलांनी स्वागत गीत सादर केले. अमृता वडवेकर यांनी पाहुण्याचा परिचय करून दिला. प्रबोधिनीचे अध्यक्ष अविनाश देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. मधुसूदन दुच्चके यांनी प्रबोधिनीला सहकार्य करणार्या बापट, फडणीस, रहाटगावकर, कसबेकर कुटुंबियांप्रती कृतज्ञता व्यक्ती केली व त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रतीक देशपांडे, अंकुश उमप, विवेक धर्माळे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. जितेंद्रनाथ महाराज, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या शुभेच्छा संदेशाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली. जयंत खदारकर यांनी अन्य संदेशाचे वाचन केले. उद्योजकता प्रकल्पाची माहिती विश्राम बापट यांनी दिली. राकेश मते यांनी वैयक्तीक गीत सादर केले. प्रवीण जोशी यांनी संचालन तर मुकुंद पांडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. अनिता व्यवहारे यांनी पसायदान सादर केल्यानंतर कार्यक्रमांची सांगता झाली. कार्यक्रमाला प्रज्ञा प्रबोधिनीशी जुळलेली सर्व मंडळी हजर होती.

# डिजिटल इंडियाच्या नादात शेकडो रोजंदारी मजुरांना मनस्ताप

## टचस्क्रीन मोबाइल असेल तरच मिळणार मासिक पास

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

डिजिटल इंडिया व पेपरलेस वर्क करण्याकरिता रेल्वे प्रशासन पुढे सरसावले आहे. परंतु रोजंदारी काम करणाऱ्या अशिक्षित मजुरांना हे तांत्रिक बदल अजूनही आत्मसात होत नसून आजही अनेक रोजंदारी मजुरांकडे टचस्क्रीन मोबाइल नाही. त्यामुळे शेकडो रोजंदारी मजुरांना रेल्वेने मासिक पास देण्यास नकार दिला आहे. स्थानिक रेल्वे प्रशासनाने कुणाचाही टचस्क्रीन मोबाइल



आणल्यावरच मासिक पास देणार असल्याचे सांगितले. त्यामुळे रोजंदारी कर्मचाऱ्यांत तीव्र असंतोष पसरला आहे.

सध्या देशात डिजिटल इंडियाचे वारे फिरत ऑनलाइनचा वापर वाढला कर असून रेल्वे प्रशासनाने सुमारे दोन ऑप महिन्यापूर्वी मासिक पास ऑनलाइनकरण्याचा निर्णय घेतला. ऑफलाइनही तुम्हाला मासिक पास मिळेल. परंतु त्याकरिता टचस्क्रीन मोबाइल मासिक पास घेणाऱ्याकडे असणे अनिवार्य केले आहे. त्यामुळे मजूर अडचणीत आले.

### रेल्वे मंत्रालयाने घेतला निर्णय

मासिक पास खरेदीकरिता ऑनलाइन पास तयार करण्याचे निर्देश रेल्वे मंत्रालयाने दिल्याची माहिती पुढे आली आहे. यासोबतच पेपरलेस वर्क कर- ण्याकरिता रेल्वे मंत्रालयाचा अधिकचा भर दिसत आहे. याकरिता रेल्वे कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही दीड ते दोन महिन्यांपूर्वी देण्यात आल्याची माहिती आहे. सध्या रेल्वे प्रशासनात मोबाइलवर प्रवासी तिकीट तसेच रेल्वे तिकिटांचे आरक्षणही सुरु झाले आहे. त्याचा लाभही अनेक रेल्वे प्रवासी घेत आहेत. थेट मोबाइलवरून प्रवाशांना तिकीटही काढून घेता येते. या रेल्वे प्रशासनाने सांगितलेल्या जमेच्या बाजू असल्या तरी सर्वसामान्य व रोजंदारी मजुरांना या तांत्रिक बाबी अजूनही कळत नाहीत. टच स्क्रीन मोबाइल नसल्यानं अनेक मजुरांना आता त्रासाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने पूर्वीसारखीच ऑफलाइन मासिक पास देण्याची गरज आहे.

# अवकाळीमुळे वाढला थंडीचा जोर

## गावात पेटल्या शेकोट्या

### कडाक्याची थंडी येत्या दिवसात आणखी कुडकुडवणार

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा**

विदर्भासह अमरावती जिल्ह्यातील वातावरणात अचानक बदल दिसून येत आहेत. काही दिवसांपूर्वी उबदार वातावरण जाणवत असताना, आता अवकाळी पावसामुळे थंडीने जोर धरल्याचे दिसून येत आहे. पावसामुळे दिवसाही थंडीचा जोर होता व शहरासह ग्रामीण भागात शेकोट्या पेटू लागल्या आहेत. गत आठवडाभर ढगाळ वातावरणामुळे दमट वातावरणाची अनुभूती होती. असे असतानाच मात्र सोमवारी पावसाने हजेरी लावली व थंडीचा जोर वाढला होता. मात्र सोमवार, मंगळवार सकाळपासूनच दमदार पाऊस बरसला व त्यामुळे थंडीचा चांगलाच जोर वाढला होता. यामुळे दिवसाही नागरिकांना गरमीसाठी शेकोटी पेटविण्याची पाळी आली होती.विशेष म्हणजे, पावसामुळे कमाल तापमान १९.९ अंशांवर तर किमान तापमान १५.९ अंशांवर आले होते.अचानकच थंडीचा जोर वाढला व त्यात पावसामुळे विशेषतः लहान बालके व वृद्धांना त्रास सहन



करावा लागत आहे, तर शहरासह ग्रामीण भागातील नागरिक थंडीपासून बचाव करण्यासाठी शेकोटीचा आधार घेताना निदर्शनास येत आहे. कपाटात ठेवलेले उनी कापडांचा वापर वाढला असून, काळजी घेतली जात आहे.

### अशी घ्या काळजी

वातावरणातील या बदलामुळे सकाळी फिरायला जाणाऱ्या लोकांना सर्दी, खोकल्याचाही त्रास होऊ शकतो. त्या दृष्टीने सतर्कता म्हणून तोंडाला मास्क अथवा रुमाल बांधूनच फिरायला जावे.

### थंडी रब्बीसाठी पोषक

गत काही दिवसांपासून जिल्ह्यात छान थंडी पडली आहे. त्यामुळे पिके बहरण्यास सुरुवात झाली आहे, थंडीमुळे रब्बी पिकास पोषक असे वातावरण निर्माण झाले आहे. वाढती थंडी पाहता शेतकरी सुखावला आहे. गहू, ज्वारी, हरभरा पिके आता बहरताना दिसत आहेत. या थंडीचा रब्बी पिकांसाठी चांगला फायदा होणार आहे.

# पृथ्वीराज चव्हाणांनी सरकार घालवले, काँग्रेसची वाताहात होण्यासही जबाबदार: विखे-पाटील

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक नगर**

राज्यात एकीकडे आरक्षणाचा मुद्दा तापलेला असताना अन्य मुद्द्यांवरूनही आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य करताना राष्ट्रवादी काँग्रेसवर टीका केली. सरकार पडण्यासाठी राष्ट्रवादी जबाबदार असल्याचा आरोप पृथ्वीराज चव्हाण



यांनी केला. यावर आता भाजप नेते आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

सहकार क्षेत्रात घेतलेल्या कडक निर्णयामुळे माझे सरकार राष्ट्रवादी काँग्रेसने २०१४ मध्ये पाडले. मला खात्री आहे की माझे सरकार जर पडले नसते. तर आम्ही दोघे राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस एकत्रित निवडणुकीला सामोरे गेलो असतो आणि २०१४ मध्ये भाजपऐवजी आमचेच सरकार आले असते. मराठा आरक्षणाचा प्रश्नही सोडावला असता. कारण, ५० वर्षाच्या कालावधीत पहिल्यांदाच मराठा आरक्षणासाठी निर्णय घेतला होता. सरकार राहिले नसल्यानं मराठा आरक्षणही न्यायालयात टिकले नाही. अन्यथा मराठा आरक्षण टिकवले असते, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले होते. यावर आता राधाकृष्ण विखे पाटील यांनी भाष्य करताना पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर टीका केली आहे.

# मुले मोबाइलमध्ये व्यस्त; पालक त्रस्त, सवय मोडायची कशी?



**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

मोठ्याच व्यक्ती नव्हे, तर लहान मुलांनाही मोबाइलचे व्यसन लागले आहे. याचा अतिरेक एवढा झाला आहे की, हातात मोबाइल नसेल तर अनेक मुलं जेवणही नाकारू लागली आहेत. याचा त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. यापासून मुलांना कसे परावृत्त करायचे, हा प्रश्न पालकांना सतावू लागला आहे.

शाळा, क्लासमधून घरी आल्यावर मुलं मोबाइलमध्ये डोके घालून बसतात कोरोनापासून ही सवय अधिक वाढली य आहे. जेवण करायचे तरी सोबत मोवाइल हवा असतो. त्यामुळे कुटुंबातील इतर सदस्यांशी संवाद कमी मि होत चालला आहे. दिवसातून तीन ते हाल चार तास मोबाइलवर कार्टून आणि अभ मुव्ही पाहिला तरी कमीच असतो, अशीही काही मुलं समुपदेशनासाठी मानसोपचार तज्ज्ञांकडे यायला लागली आहेत. याशिकय शारीरिक आरोग्यावर होणारे परिणाम वेगळे आहेत ही समस्या दिवसेंदिवस कठीण होत असून, याचा त्रास पालकांनादेखील होत आहे.

**याकडे लक्ष द्या...**

जेवताना, नाष्टा करताना किया दूध-चहा पिताना मोबाइल फोन पाहत असाल तर त्याचे व्यसन लागू शकते. त्यामुळे मुलांनी कितीहीं हट्ट केला तरी त्यांच्या हातात मोबाइल देऊ नका.

**काय काळजी घ्याल?**

मुलं जेवण करीत असताना त्यांच्याशी गप्पा मारा, जेव्हा भूक लागली असेल, तेव्हाच खायला द्या. मोबाइल दाखवून जेवण देण्याचा प्रयल करू नका. मुलं जेवताना मोबाइल पाहण्याचा हट्ट करत असतील तर त्यांना दुष्परिणाम समजावून सांगा. मुलांच्या आवडीचे पदार्थ त्यांना द्या. पालकांनीही जेवताना, चहा-कॉफी पिताना मोबाइल पाहणे टाळावे. मुले ही पालकांचे अनुकरण करीत असतात.

# वऱ्हाडी मंडळींनो सावधान; लग्न समारंभात चोरटे 'ॲक्टिव्ह मोडवर'

## पाहुणे बनून येतात, हात साफ करून जातात: लग्नसराईत दागिने जपा

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

तुळशीचे लग्न आटोपले असून,आता लग्नसराईचा धूमधडाका सुरू झाला आहे. त्यामुळे आता हॉल, सभागृह, लॉन्स, मंगल कार्यालये पुढील काही काळापर्यंत हाऊसफुल्ल राहणार आहे. अनेक जण नटून थटून लग्नकार्यात हजेरी लावतात. मात्र, हे महागात पडू शकते. लग्नकार्यातून लाखोंच्या दागिन्यांची चोरी झाल्याच्या घटना दरवर्षी घडतात. लग्नसराईला सुरुवात झाली असून, चोरटे 'ॲक्टिव्ह मोडवर' आले असून, नागरिकांनी वेळीच सावध होण्याचे आवाहन अमरावती पोलिस विभागाकडून करण्यात



आले आहे.

शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात लॉन्स, सभागृह, मंगल कार्यालये आहेत. याठिकाणी सायंकाळच्या लग्नाची धूमदेखील हमखास पाहावयास मिळते. अलीकडे बदलत्या जीवनमानामुळे लग्न समारंभ मोठ्या थाटात होत आहेत. हॉल भाडे. डेकोरेशन सेट, जेवण, फोटोग्राफी, दागिन्यांवर वारेमाप खर्च केला जातो आहे. त्याचबरोबर वऱ्हाडी मंडळीहीआपल्या तोऱ्यात असतात. मात्र, हाच वारेमाप खर्च हेरून चोरट्यांकडून लग्न समारंभाला टार्गेट केले जाते. लग्न सोहळ्यांमध्ये चोऱ्या करणाऱ्या परराज्यातील अनेक टोळ्या सध्या शहरासह जिल्ह्यात ठाण मांडून बसल्या असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

लग्नात पाहुणे म्हणून जायचे आणि महिलांच्या गळ्यातील, पर्समधील दागिने चोरायचे, असा फंडा सराईत चोरटे करतात, वर, वधू पक्षांकडील कोणालाही कळणार नाही अशा न पद्धतीने या टोळ्या लग्नात मिरवत असतात. त्यामुळे नागरिकांनी विशेषतः महिलांनी लग्न सोहळ्यात जाताना दागिने चोरीला जाऊ नये याची खबरदारी घेणे गरजेचे आहे, हेही तितकेच खरे,

**अशी घ्यावी काळजी...**

महागडे दागिने परिधान करताना दक्ष राहा. लग्न समारोहात आजूबाजूला लक्ष ठेवा.अनोळखी व्यक्ती जवळ आल्यास वेळीच सावध व्हा.चोरीची माहिती तत्काळ डायल ११२ ला कळवा.

**लहान मुलांचा करतात वापर**

लग्न सोहळ्यात महिलांच्या गळ्यातील दागिने अलगद चोरण्यासाठी आठ ते दहा वयोगटातील लहान मुलांचा वापर चोरट्यांकडून केला जातो. दागिने कसे चोरायचे याचे एकप्रकारे प्रशिक्षणच त्यांना दिले जाते. कोणी हटकले तर चोरीसाठी आलेल्या महिला व लहान मुलांकडून शक्कल लढवून वर पक्षाला सांगायचे आम्ही वधू पक्षाकडील आहोत, तर वधू पक्षाकडील कुणी हटकले, तर आम्ही वर पक्षाकडील आहोत, अशी शक्कल ही टोळी लढवते.

# भाजप राजस्थानी प्रकोष्ठ सेलची कार्यकारिणी जाहिर



**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारतीय जनता पार्टी शहर जिल्हाध्यक्ष प्रवीण पोटे पाटील यांच्या आदेशानव्ये व ऋषिकेश शर्मा यांच्या नेर्तुत्वात नुकतीच भाजप राजस्थानी सेलची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. ज्यामध्ये शहर जिल्हाध्यक्ष प्रवीण पोटे पाटील यांनी ऋषिकेश अनिल शर्मा यांची राजस्थानी सेलच्या अध्यक्षपदी निवड केली

यासोबतच ऋषिकेश शर्मा यांनी सेलचे सरचिटणीस पदी राहुल सत्यनारायण शर्मा, जयकिशन नारायणजी शर्मा, सेलचे उपाध्यक्षपदी ओमप्रकाश बाबुलालजी उपाध्याय, मनीष मांगीलालजी ओझा, प्रदिप शंकरलालजी उपाध्याय, बालकिशन नारायणजी शर्मा, अशोक जोशी, सेलचे सचिवपदी- प्रशांत ओमप्रकाशजी शर्मा, संदीप रामचंद्रजी पांडे, संदीप रामचंद्रजी ओझा, पवन कोलारिया, सदस्यपदी- शुभम बालकिशन शर्मा, शुभम सत्यनारायणजी शर्मा, जयेश संतोषजी पांडे यांची निवड केली.

# हरिनामच्या गजराने कौंडण्यपूर दुमदुमले : दहिहंडी सोहळ्याला हजारो भाविक

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक कौंडण्यपूर**

श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे जय हरी विठ्ठलाच्या गजरात हजारो भाविकांच्या व जगद्गुरु राजराजेश्वराचार्य महाराज, आ. यशोमती ठाकूर यांच्यासह इतरांच्या उपस्थितीत मंगळवारी कार्तिक मास समारोप व दहिहंडी सोहळा थाटात पार पडला. विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणार्या तथा माता रूक्मिणीचे माहेरघर श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे २० नोव्हेंबर पासून कार्तिक मास सोहळ्याचा प्रारंभ झाला होता. नऊ दिवसांपासून सुरू असलेला या सोहळ्यामध्ये पहाटे काकडा आरती, किर्तन, भजन आदी विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती.

मंगळवारी समारोपीय काकडा आरतीनंतर शासकीय महापूजा व पादुका पूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मानद सचिव संदीप जोशी (माजी महापौर नागपूर) यांच्या हस्ते करण्यात आले. उत्सवाकरिता सोमवारी रात्रीच विदर्भातील विविध संस्थांमधील पालख्या कौंडण्यपूर नगरीत दाखल झाल्या होत्या. सकाळी ८ पासून पावसाच्या धारा कोसळत असताना सुद्धा मंदिर परिसरातून हरिनामाचा गजर करीत पालखी सोहळा सुरू झाला. पालख्यासमवेत वारकर्यांनी गावातून प्रदक्षिणा घातली. गावकर्यांनी मोठ्या उत्साहात त्यांचे स्वागत केले. काल्याचे किर्तन हभप कन्हैया महाराज राजपूत यांनी केले.

जितेंद्रनाथ महाराज (पिठाधिश्वर देवनाथ मठ अंजनगाव सुर्जी) व राजराजेश्वराचार्य महाराज माउली सरकार (पिठाधिश्वर रूक्मिणी पिठ अंबिकापूर) यांचे प्रबोधन झाले. सायंकाळी ४ वा.गोपाळपूरी परिसरात दहिहंडीचा कार्यक्रम पार पडला. या सोहळ्याला हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांनी उपस्थिती दर्शवून दहिहंडीचा लाभ घेतला. नेत्रदीपक सोहळ्याला तिवसा पंचायत समिती सभापती रोशनी पुनसे, शिल्पा हांडे, निवेदिता दिघडे, राजेश वानखडे, संजय देशमुख, गौरी देशमुख, सरपंच कौंडण्यपूर प्रेमदास राठोड प्रशांत ठाकरे, संस्थानचे अध्यक्ष नामदेव अमाळकर, उपाध्यक्ष वसंत डाहे, सचिव सदानंद साधू, विश्वस्त अशोक पवार, सुरेश चव्हाण, अतुल ठाकरे आदींची उपस्थिती होती.

